www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 212 वा गुरुवार दि. 17 एप्रिल २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## भीम जयंती ते शिवजयंती मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन.

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

रिसोडः उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय, उदगीर यांच्या वतीने भीम जयंती ते शिवजयंती पर्यंत मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे. उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय गेल्या 17 वर्षापासून रुग्णांच्या सेवेमध्ये कार्यरत असून आत्तापर्यंत जवळपास एक लाख 80 हजार मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून अव्यहातपणे सेवा चालू आहे. गत पंधरा वर्षापासून वाशिम अकोला बुलढाणा हिंगोली या जिल्ह्यातून नेत्र रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रिया करिता उदगीर येथे नेले जातात. जिल्ह्यातील प्रत्येक गाव वाडीवस्त्यावर मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करून रुग्णालयाच्या वतीने नेत्र रुग्णवाहिका रुग्णांना रुग्णालयापर्यंत पोहोचविण्याचे काम करीत आहे. आर्थिक दुर्बल घटकातील रुग्ण व जे खाजगी रुग्णालयांमध्ये मोतीबिंदू शस्त्रक्रिया करू शकत नाहीत अशा रुग्णांसाठी तेथे अल्प दरामध्ये सेवा उपलब्ध आहे. मोतीबिंदू शिवाय काचबिंदू नासुर डोळ्यातील पडद्याची शस्त्रक्रिया व इतर सर्व डोळ्यातील दुर्धर आजाराची तपासणी व शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध आहे. तज्ञ नेत्र शल्यचिकित्सक, डोळ्यातील इतर सर्व आजारावर तपासणी व शस्त्रक्रिया करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांची टीम व 120 इतर कर्मचारी असून अत्याधुनिक सुसज्ज अशा 50 खाटांची व्यवस्था तिथे आहे. जेवण चहापाणी नाश्ता सर्व व्यवस्थित सह विनम्र सेवेस करिता उदयगिरी लायन्स नेत्र रुग्णालय संपूर्ण महाराष्ट्र मध्ये सुपरीचीत आहे. भीम जयंती ते शिवजयंती पर्यंत जिल्ह्यामध्ये प्रत्येक गावाकडे वस्तीवर मोफत नेत्र शिबिर आयोजित करण्याचा संकल्प रुग्णालयाच्या वतीने करण्यात आल्याची माहिती विदर्भ मराठवाडा शिबिर संयोजक, ठाकूर महावीर सिंग यांनी कळविले आहे. जिल्ह्यातील सर्व सरपंच त्यांनी आपल्या गावामध्ये मोफत शिबिर आयोजित करून गाव अंधमुक्त करण्याचे आवाहन रुग्णालयाचे वतीने करण्यात आले आहे.




## शेकापचे मा. आ. श्री पंडितशेठ पाटील व श्री आस्वाद पाटील यांचा भाजपात जाहीर प्रवेश!



**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

भाजपाचा विकासाभिमुख दृष्टिकोन, पारदर्शक नेतृत्व व जनतेच्या भावनांना प्रतिसाद देणारे धोरण पाहता, अनेक मान्यवर नेते व कार्यकर्ते भाजपात विश्वासाने प्रवेश करत आहेत. प्रदेशाध्यक्ष मा. रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत शेकापचे मा. आमदार श्री पंडितशेठ पाटील व श्री आस्वाद पाटील यांनी भाजपात आज जाहीर प्रवेश केला. यावेळी त्यांचे पक्षात स्वागत केले.

रायगड जिल्हा शत प्रतिशत भाजपामय होणार असल्याचा विश्वास यावेळी मा. रवींद्र चव्हाणजी यांनी व्यक्त केला. प्रसंगी खासदार श्री धैर्यशील पाटील, आमदार श्री महेश बालदी, आमदार श्री विक्रांत पाटील व श्री अविनाश कोळी उपस्थित होते.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कर्मचाऱ्यांना पुरस्कार वितरण,

**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न, भारतरत्न, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त औंध जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना बहुजन वंचित कामगार आघाडीच्या वतीने पुरस्कार वितरण करण्यात आले होते, जिल्हा रुग्णालय शल्यचिकित्सक डॉ नागनाथ यमपल्ले, यांच्या हस्ते वितरण करण्यात आले, यावेळी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक राकेश बेद, राज बाबू सरकनीया, विजय जाधव, पोपट बिवाल, दयाराम सिरसे, बलराम लखन, निखिल विजय बेद काशिनाथ सिरसे, राजीव रमेश बेद, प्रदीप सोलंकी, किशोर लालबिगे, नारायण पवार, प्राची साळवे, आदि यावेळी उपस्थित होते, कार्यक्रमाचे आयोजन बहुजन वंचित कामगार आघाडीचे संस्थापक अध्यक्ष विजय चांद बेद,राजु बेद, दामोदर शिर्के, हरी परदेशी, अरुण शिंदे, प्रियंका जाधव, रवी सरकनीया, यांनी केले



## नंदकिशोर भगत यांची चेअरमन पदी निवड

**दैनिक युवक आधार**



**नवीन पनवेल :** रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्था पेणच्या चेअरमनपदी नंदकिशोर कृष्णा भगत यांची निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल त्यांचे विविध राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकार, ग्रामसेवक संघटना पनवेल यांनी शुभेच्छा देत अभिनंदन केले आहे.

## जनसेवा पाणी अभियान सुधाकर भाऊ फाउंडेशन ...

### वाढता उन्हाळा वाढती पाण्याची टंचाई पण मी आहे तुमच्यासोबत!सुधाकर घारे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी वार्ताहर**

कर्जत-खालापूर परिसरात उन्हाळा सुरु होताच पाण्याची टंचाई ही नेहमीचीच समस्या बनली आहे. आजवर अनेकांनी आश्वासनं दिली, पण शाश्वत उपाय मात्र दिसून आले नाहीत. पण आता आम्ही केवळ आश्वासन नाही तर कृती करतो आहोत असे म्हणत खांडस ग्रामपंचायतमधील टेपाचीवाडी येथे मधुकर भाऊ घारे यांच्या हस्ते "सुधाकर भाऊ घारे फाउंडेशनच्या" वतीने मोफत पाण्याचा टँकर गावकऱ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आला.




या वेळी गावकऱ्यांच्या चेहऱ्यावर जो आनंद दिसला, तोच पुढील सामाजिक कार्यासाठी ऊर्जा देणारा ठरेल असे म्हणत घारे फाउंडेशनच्या वतीने जिथे पाण्याची कमतरता आहे तेथील माहिती आम्हाला कळवावी असे सांगितले. या वेळी अशोक पाटील, गोपीनाथ भोईर, अरुण ऐनकर, कविता आईनकर, कमलाकर रसाळ, अमर लांगी, सुजित लोकरे, अनिल हिंदोला, रामदास हिंदोला, नामदेव मेंगाल, दाजी ऐनकर, भूषण आसावले, साहिल पवार तसेच इतर पदाधिकारी व कार्यकर्ते. पाणी हा हक्क आहे, उपकार नाही. या लढाईत आम्ही तुमच्यासोबत आहोत – शाश्वत समाधान मिळेपर्यंत !अशी भावना व्यक्त करीत जनसेवा पाणी अभियान सुधाकर भाऊ फाउंडेशने हाती घेतल्याचे दिसत आहे.

## मे केन्स्पेक केमिकल्स कंपनीने स्थानिकांवर अन्याय करू नये : निलेश सोनावणे

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

तळोजा आद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मे केन्स्पेक केमिकल्स प्रा ली कंपनीने स्थानिक १०४ तरुणांना कोणतेही ठोस कारण न देता कामावरून कमी केले आहे याबाबत गेली अनेक महिने हे कामगार बेरोजगार झाले आहेत १५ एप्रिल २०२५ पासून कामगारांनी कंपनी गेट समोर ठिय्या आंदोलन

सुरु केले आहे या आंदोलनाला जागृती ऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी जागृती फाऊंडेशन च्या कार्यकर्त्यांसमवेत भेट दिली यावेळी कंपनी व्यवस्थापनाला स्थानिकांवर अन्याय करू नये त्यांना बेरोजगार करू नये असे कंपनी व्यस्थापनाला सांगितले आहे. तळोजा आद्योगिक वसाहतीमध्ये असलेल्या मे केन्स्पेक केमिकल्स प्रा ली कंपनी मध्ये आजूबाजूचे कामगार गेली दहा ते वीस वर्षे कंपनीच्या विविध विभागात काम करीत आहेत डिसेंबर २०२३ मध्ये कंपनीला आग लागल्याने उत्पादन प्रक्रिया बंद करण्यात आली होती कंपनी सुरु झाल्यावर परत आपल्याला कामावर घेतले जाईल या आशेने सर्व कामगार कंपनी सुरु होण्याची वाट बघत होते मात्र कंपनी सुरु झाल्यावर काही कामगारांना कंपनीने कामावर घेतेले मात्र स्थानिक भूमिपुत्र असलेल्या या १०४ कामगारांना घराचा रस्ता दाखवला या बाबत कामगारांनी विविध विभागाकडे पाठपुरावा करीत न्याय हक्कासाठी लढाई सुरु केली आहे ,कंपनी कंत्राटदाराच्या माध्यमातून बाहेरील कामगार आणून काम करून घेत आहे ,मात्र भूमिपुत्रांना सामावू घेण्यास टाळाटाळ करीत आहे .व्यवस्थापनातील काही मंडळी जाणीवपूर्वक मालक आणि कामगारांमध्ये संघर्ष घडवून आणत आहे कंत्राटदाराला हाताशी घेऊन बाहेरील कामगारांकडून




काम करून घेत आहे याबाबत कामगारांनी कंपनी गेट समोर ठिय्या आंदोलन सुरु केले असून कंपनीमध्ये परत कामावर घेत नाही तोपर्यंत आंदोलन सूर राहील असे कामगारांनी सांगितले आहे या आंदोलनाला जागृती फाऊंडेशन चे अध्यक्ष निलेश सोनावणे यांनी कामगारांची भेट घेतली यावेळी त्यांच्या सोबत ,तळोजा विभागीय उपाध्यक्ष संदेश पाटील ,सचिव कुवर पाटील, विकेश पाटील,कल्पेश कांबळे ,आदी जण उपस्थित होते

## पत्रकार उत्कर्ष समिती महाराष्ट्रच्या उरण तालुका अध्यक्षपदी

### डॅशिंग पत्रकार पूजा चव्हाण यांची नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**उरण प्रतिनिधी/सायली साळुंके**

पत्रकार उत्कर्ष समिती उरण तालुका अध्यक्षपदी शिवराज्य न्युज चैनलच्या डॅशिंग पत्रकार पूजा चव्हाण यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.रविवार दिनांक 13 एप्रिल रोजी शासकीय विश्रामगृह पनवेल येथे झालेल्या निवड प्रक्रिये वेळी पत्रकार उत्कर्ष समिती चे महाराष्ट्र अध्यक्ष डॉ.श्री अशोक म्हात्रे यांनी सर्वांच्या उपस्थितीत पूजा चव्हाण यांची उरण तालुका अध्यक्षपदी निवड घोषित केली. समाजात घडणाऱ्या विविध विषयांवर आक्रमकपणे लिखाण करून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देण्यासाठी आपल्या लेखणच्या माध्यमातून पूजा चव्हाण पत्रकारिता करत असतात. पूजा चव्हाण यांच्या या निवडीने समाजातील विविध स्तरातून त्यांच्यावर अभिनंदनचा वर्षाव होत आहे.



## अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅबची नुकतीच सुरू

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पनवेल शहरातील नागरिकांसाठी आता आरोग्य सेवा अधिक सुलभ आणि सर्वसमावेशक होणार आहेत. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी क्लिनिक आणि धनवंतरी डायग्नोस्टिक्सच्या अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅबची नुकतीच सुरूवात झाली आहे. राज्याच्या सार्वजनिक आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर यांनी मंगळवारी या दोन्ही आरोग्य सुविधांचे उदघाटन केले. याप्रसंगी पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर प्रमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना आरोग्य मंत्री मेघना बोर्डीकर म्हणाल्या की, केंद्र आणि राज्य सरकार चांगल्या दर्जाच्या आरोग्य सुविधा सर्वांपर्यंत पोहोचवण्यासाठी काम करत आहे आणि जवादे कुटुंबीय देखील आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजाची सेवा करत आहेत, हे कौतुकास्पद आहे. त्यांनी पनवेल शहरात सुरु झालेल्या या आधुनिक आरोग्य सुविधांचे अभिनंदन केले. तसेच, पनवेल हे अवयव प्रत्यारोपणासाठी 'हब' व्हावे, असे प्रतिपादनही त्यांनी केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनीही जवादे कुटुंबियांचे अभिनंदन केले आणि त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी क्लिनिकमुळे परिसरातील रुग्णांना एकाच ठिकाणी विविध विशेषज्ञ डॉक्टरांचा सल्ला आणि आधुनिक निदान सुविधा उपलब्ध होणार आहेत, असे ते म्हणाले. डॉक्टर्स गॅलेक्सी मल्टीस्पेशालिटी क्लिनिकमध्ये ऑर्थोपेडिक्स, युरोलॉजी, नेफ्रोलॉजी, गायनेकोलॉजी, बालरोग, कार्डिओलॉजी, ऑर्गन ट्रान्सप्लांटेशन क्लिनिक यांसारख्या अनेक विशेषज्ञ विभागांतील तज्ज्ञ डॉक्टर नियमितपणे उपलब्ध असणार आहे. तसेच धनवंतरी डायग्नोस्टिक्सच्या अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅबमध्ये विविध तपासण्यांसोबतच हिस्टोपॅथोलॉजी आणि सायटोलॉजीसारख्या विशेष निदान सेवा देखील उपलब्ध असणार आहेत. डॉक्टर कैलास जवादे आणि डॉक्टर वैशाली जवादे यांच्या प्रयत्नातून एकाच ठिकाणी मल्टीस्पेशालिटी क्लिनिक आणि अत्याधुनिक पॅथोलॉजी लॅब सुरू झाल्यामुळे पनवेल आणि आसपासच्या नागरिकांना उच्च दर्जाच्या वैद्यकीय सेवा मिळण्यास मदत होणार आहे. या उदघाटन सोहळ्याला माजी नगरसेवक राजू सोनी, माजी मुख्याध्यापक गोपीकिशन सिखवाल, प्रभाकर वाघीकर,



हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर गोपाल जवादे, सुभाषदादा देशमुख,बाधकांम व्यावसायिक मिलिंद पोटे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

## मराठी चित्रपटसृष्टीतील अनुभवी कलाकार आनंद बुरड यांना मलयाळम सुपरस्टार मोहनलाल यांच्यासोबत काम करण्याची संधी!

**दैनिक युवक आधार**
**- किशोर रमाकांत गुडेकर**
**मुंबई प्रतिनिधी विभाग प्रमुख**

मराठी चित्रपटसृष्टीत 2013 पासून कार्यरत असलेले आणि 'उर्फी', 'ऑनलाइन बिनलाइन' यांसारख्या 17 हून अधिक चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाची छाप सोडणारे कलाकार आनंद बुरड यांना आता मलयाळम सुपरस्टार मोहनलाल यांच्यासोबत स्क्रीन शेअर करण्याची अनोखी संधी मिळाली आहे. या चित्रपटात प्रसिद्ध अभिनेत्री मालविका मोहनन देखील प्रमुख भूमिकेत आहेत. मोहनलाल यांच्या आगामी 'हृदयपूर्वम' या चित्रपटासाठी आनंद बुरड यांची निवड झाली. नुकतेच त्यांनी या चित्रपटाच्या चित्रीकरणात सहभाग घेतला. आपल्या भूमिकेबद्दल बोलताना आनंद बुरड यांनी सांगितले की, त्यांची भूमिका खूपच छान आहे त्यांना मजेदार विनोदी प्रसंग साकारायला मिळाला आहे. 'द मेल', 'तबकडी आणि 'पिचकारी' यांसारख्या त्यांच्या आगामी चित्रपटांच्या यादीत आता 'हृदयपूर्वम' ची भर पडली आहे. मोहनलाल यांच्यासारख्या मोठ्या कलाकारासोबत काम करण्याची संधी मिळाल्याने आनंद बुरड खूप आनंदित आहेत आणि या अनुभवाला ते त्यांच्या यशस्वी कारकिर्दीतील एक महत्त्वाचा टप्पा मानतात.





## आ.प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते 'प्रज्ञासूर्य' जयंती विशेषांकाचे प्रकाशन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न बोधिसत्व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती दिनाचे औचित्य साधून रसायनी येथील पत्रकार आनंद पवार यांनी प्रकाशित केलेल्या प्रज्ञासूर्य अंकाचे प्रकाशन पनवेलचे लोकप्रिय कार्यसम्राट आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते व महाराष्ट्राचे ख्यातनाम गायक साजन बेंद्रे व विशाल यांच्या प्रमुख उपस्थितीत नवीन पनवेल येथे पनवेल महानगर पालिकेचे माजी नगरसेवक ऍड. प्रकाश बिनेदार यांनी आयोजित केलेल्या भीम जयंती महोत्सवात करण्यात आले. या प्रकाशन सोहळ्याला भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, पनवेल महानगरपालिकेचे माजी नगरसेवक तथा आंबेडकर चळवळीचे झुंजार नेते प्रकाश बिनेदार, माजी नगरसेविका दर्शना भोईर, कामगारनेते रवी नाईक, अविनाश गायकवाड, विनोद जोशी, ज्येष्ठ पत्रकार श्याम साळवी आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.




पत्रकार आनंद पवार हे दरवर्षी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त प्रज्ञासूर्य या विशेष अंकाच प्रकाशन करत असतात प्रज्ञासूर्य या जयंती विशेष अंकामध्ये डॉ.बाबासाहेबांच्या जीवनपटावर आधारित महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिकांचे लेख कविता या प्रज्ञासूर्य अंकामध्ये प्रकाशित केले जातात.प्रज्ञासूर्य हा विशेषांक वाचकांसाठी लोकप्रिय ठरले असल्याची प्रतिक्रिया साहित्यिक लेखक व सामान्य वाचकांमधून व्यक्त होत आहे.

## धानोरा जिल्हा परिषद शाळा येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**



**राळेगाव:-** पं.स.अंतर्गत येणाऱ्या जि. प.उच्च प्राथमिक सेमी इंग्रजी केंद्र शाळा धानोरा येथे परमपूज्य भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. सर्वप्रथम भारतरत्न डॉ.आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून रीतसर कार्यमक्रमाला सुरुवात झाली. त्यानंतर शाळेतील काही विद्यार्थ्यांनी आपल्या मनोगतातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर व जीवनावर प्रकाश टाकण्यात आला. त्यामध्ये साची मानकर, परी पाटील,सर्वज्ञ शेंडे, हार्दिका घोडे, अनुष्का गुजरकर, अनुष्का धूर्वे, हिमांशी पन्नासे, नंदिनी कारवटकर, रीचिता ताकसांडे, तनश्री कारवटकर तसेच शाळेतील शिक्षकवृंद यांनी आपल्या मनोगतातून सुद्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याची माहिती विद्यार्थ्यांना पटवून सांगितली. व तसेच डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या वेशभूषेत राजवीर तोडासे, कुणाल पवार तर रमाबाई यांच्या वेशभूषेत रीचिता ताकसांडे हे विद्यार्थी होते. त्याचप्रमाणे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यावर रीचिता ताकसांडे व तनश्री कारवटकर या विद्यार्थ्यांनी गीत सादर केले. सरते शेवटी त्यांना प्रोत्साहन पर बक्षीस देऊन गौरविण्यात आले.तर दररोज शाळेत उपस्थिती असणाऱ्यांना शाळेकडून बक्षीस देण्यात आले यामध्ये नंदिनी संजय कारवटकर वर्ग ९ वा व भुषण संजय मेश्राम वर्ग ७ वा यांना बक्षीस देण्यात आले, त्यानंतर खाऊ वाटपाने या कार्यक्रमाची सांगता झाली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संजय कारवटकर तर शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष सौ दीक्षा ताई मून, तसेच शाळेचे उच्च श्रेणी मुख्याध्यापक विजय लांबट, शाळेतील शिक्षकवृंद अविनाश ठाकरे, रत्नमाला धूर्वे,रीना चौधरी,संदीप टुले,योगेश घोडे, मदतनीस विजय मेश्राम तसेच शाळेतील सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्त कर्मचाऱ्यांना पुरस्कार वितरण,


**दैनिक युवक आधार**
**वार्ताहर**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार विश्वरत्न, भारतरत्न, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त औंध जिल्हा रुग्णालयामध्ये रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना बहुजन वंचित कामगार आघाडीच्या वतीने पुरस्कार वितरण करण्यात आले होते, जिल्हा रुग्णालय शल्यचिकित्सक डॉ नागनाथ यमपल्ले, यांच्या हस्ते वितरण करण्यात आले, यावेळी महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळाचे महाव्यवस्थापक राकेश बेद, राज बाबू सरकनीया, विजय जाधव, पोपट बिवाल, दयाराम सिरसे, बलराम लखन, निखिल विजय बेद काशिनाथ सिरसे, राजीव रमेश बेद, प्रदीप सोलंकी, किशोर लालबिगे, नारायण पवार, प्राची साळवे, आदि यावेळी उपस्थित होते, कार्यक्रमाचे आयोजन बहुजन वंचित कामगार आघाडीचे संस्थापक अध्यक्ष विजय चांद बेद,राजु बेद, दामोदर शिर्के, हरी परदेशी, अरुण शिंदे, प्रियंका जाधव, रवी सरकनीया, यांनी केले




## पनवेलच्या बारवई, ठोंबरेवाडीत रानगव्याचा मुक्त संचार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल : वार्ताहर**



पनवेल तालुक्यातील बारवई, ठोंबरेवाडी परिसरात रानगवा मुक्तसंचार करत आहे. त्यामुळे येथील ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. वन विभागाने या रानगव्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी केली जात आहे. पनवेल तालुक्यात पूर्वी मोठ्या प्रमाणात जंगल होते मात्र हे जंगल नामशेष होत चाललेले आहे. त्यामुळे वन्यजीव मानवी वस्तीत प्रवेश करत आहेत. यापूर्वी देखील वन्यजीव मानवीवस्तीत प्रवेश करत असल्याच्या घटना घडल्या आहेत. नष्ट होणाऱ्या जंगलामुळे वन्यजीवांचे अधिवास धोक्यात आले आहे. अनेक ठिकाणी इमारतींचे कामे सुरू असल्याने वन्यजीवांचा अधिवास धोक्यात आला आहे. त्यामुळे बिबटे, वाघ, रानगवा, कोल्हे मानवी वस्तीत येऊ लागले आहेत.खारघर मध्ये अनेक वेळा सोनेरी कोल्ह्याचे दर्शन झाले आहे. तर काही ठिकाणी बिबट्याचा वावर देखील दिसून आला आहे. या रानगव्याच्या गळ्यात एक दोर अडकला असून त्याद्वारे त्याला पकडण्याचा प्रयत्न करू नये असे आवाहन वनविभागातर्फे करण्यात आले आहे.

# पनवेलच्या स्वस्तिका घोषला महाराष्ट्रातील प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर




**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

महाराष्ट्रातील प्रतिष्ठेच्या समजल्या जाणाऱ्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कारांची घोषणा मंगळवारी करण्यात आली. हा मानाचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार (सन 2023-24) करिता पनवेलच्या स्वस्तिका घोष हिला टेबल टेनिस खेळात जाहीर झाला आहे. या पुरस्काराचे वितरण पुण्यात शुक्रवारी (दि.१८)सकाळी ११ वाजता बालेवाडी येथील शिवछत्रपती क्रीडा संकुलात राज्यपाल सी पी राधाकृष्ण यांच्या उपस्थितीत होणार आहे. स्वस्तिकाला मिळणारा पुरस्कार पनवेलकरांसाठी अभिमानाची बाब आहे. या सोहळ्याला राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहे. स्वस्तिका घोषला प्रतिष्ठेचा शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्कार जाहीर झाल्याने तिचे सर्व स्तरांतून अभिनंदन व कौतुक होत आहे. आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वस्तिका घोष ही जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या सीकेटी कॉलेजची विद्यार्थिनी आहे. खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कुलमध्ये स्वस्तिकाने इयत्ता तिसरी ते बारावीपर्यंत शिक्षण घेतले. त्यानंतर आता ती खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयात (स्वायत्त) बीएमएसचे शिक्षण घेत आहे. स्वस्तिकाने देशात व परदेशात झालेल्या टेबल टेनिस स्पर्धेत चमकदारी कामगिरी करीत देशाचे नाव उंचाविले आहे. गेल्या दहा वर्षांपासून ती महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व करीत आहे. खारघरच्या रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये ती दररोज सहा तास खेळाचा सराव करीत असते. स्वास्तिकाचे वडील संदीप घोष हे या खेळातील प्रशिक्षक आणि सल्लागार आहेत. जाहीर झालेल्या शिवछत्रपती राज्य क्रीडा पुरस्काराबाबत प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया देताना स्वस्तिकाचे वडील संदीप घोष यांनी सांगितले की, टेबल टेनिससाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी स्वस्तिकाला वेळोवेळी आर्थिक मदत करण्याबरोबरच प्रशिक्षणासाठी खारघर येथील विद्यालयात विशेष सोय केली आहे. स्वस्तिकाच्या या यशाचे संपूर्ण श्रेय जनार्दन शिक्षण प्रसारक संस्था, लोकनेते रामशेठ ठाकूर यांना जाते.



## एन.एम.एम.एस शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जि.प.उ.प्राथमिक मराठी शाळा चिखलवर्धा शाळेची यशाची परंपरा कायम.

**दैनिक युवक आधार**
**घाटंजी प्रतिनिधी -**
**महेश पेंन्दोर**




**घाटंजी:-** तालुक्यातील विद्यार्थी डिसेंबर 2024 मध्ये घेण्यात आलेल्या राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना एन.एम.एम.एस. परीक्षेत घाटंजी तालुक्यातील जि.प.उ.प्राथमिक मराठी शाळा चिखलवर्धा,केंद्र कुर्ली या शाळेने उल्लेखनीय यश प्राप्त केले आहे. या शाळेचे सहा विद्यार्थी उत्तीर्ण होऊन एका विद्यार्थ्याची राष्ट्रीय शिष्यवृत्तीसाठी निवड झाली आहे. यावर्षीही शाळेने परीक्षेतील आपल्या उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे. अनुकल्प प्रकाश शेंडे या विद्यार्थ्याने इतर मागास प्रवर्ग मधून गुणवत्ता यादीमध्ये शिष्यवृत्तीसाठी स्थान प्राप्त केले आहे. आर्थिक दुर्बल घटकातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन बुद्धिमान विद्यार्थ्यांना सर्वोत्तम शिक्षण मिळण्याच्या दृष्टीने त्यांना आर्थिक सहाय्य करावे, हा या योजनेचा गाभा आहे. प्रज्ञावान विद्यार्थ्यांना दरमहा शिष्यवृत्तीच्या स्वरूपात आर्थिक मदत करण्यात येते. शिष्यवृत्तीस पात्र ठरलेल्या विद्यार्थ्यांना चार वर्षासाठी वार्षिक 12 हजार रुपये याप्रमाणे चार वर्षाचे 48 हजार रुपये शिष्यवृत्ती मिळणार आहे. तसेच कु.हिमांशी प्रमोद जाधव,कु. किंजल राजू घोडाम, कु. हर्षदा रमेश कुमरे, कु. सोनल रमेश जुमनाके व शिवम उत्तम आत्राम असे पाच विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहे. या विद्यार्थ्यांना शाळेतील शिक्षक श्री. पवन राठोड सर , श्री.ताराचंद लाढाणी सर ,श्री. विष्णू कनाके सर , कु. कल्पना केराम मॅडम , कु. अरुणा मडावी मॅडम व तसेच शाळेचे मुख्याध्यापक श्री.आशिष पवार सर यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. या यशाबद्दल शाळा व्यवस्थापन समिती तसेच पालक, ग्रामस्थ तसेच केंद्रप्रमुख श्री.विलास किरणापुरे सर, शिक्षण विस्तार अधिकारी श्री.विशाल साबापुरे सर, घाटंजी पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी श्री.वांढरे साहेब यांनी यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षक यांचे कौतुक करून अभिनंदन केले आहे.

## संघटन चळवळीतील वटवृक्ष ग.दि.कुलथे अनंतात विलीन

### अधिकारी-कर्मचारी संघटनेतील संवाद सेतू हरपला: मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी**



राज्यातील सर्व शासकीय राजपत्रित अधिकाऱ्यांची अधिकृत शिखर संघटना महाराष्ट्र राज्य राजपत्रित अधिकारी महासंघाचे संस्थापक अध्यक्ष, मुख्य मार्गदर्शक, सल्लागार श्री.गणपत दिनकर कुलथे, यांचे वयाच्या 87 व्या वर्षी वृद्धापकाळाने तसेच हृदयविकाराच्या झटक्याने त्यांच्या नेरुळ येथील राहत्या घरी काल दि.14 एप्रिल रोजी रात्री 9.00 वाजता निधन झाले. पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असे नेतृत्व आणि कुशल संघटक ज्येष्ठ नेते गणपत दिनकर कुलथे यांच्या निधनामुळे शासन आणि अधिकारी-कर्मचारी संघटनेतील संवाद सेतू हरपला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. आपल्या शोकसंदेशात मुख्यमंत्री म्हणतात,ग. दि. कुलथे यांनी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रश्न कौशल्याने सोडविले. पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असणारे कुलथे स्वभावाने अतिशय शांत आणि संयमी होते. मात्र महत्वाच्या प्रश्नांवर त्यांनी अतिशय कणखर भूमिका घेतली. राजपत्रित अधिकारी महासंघाचे संघाचे प्रदीर्घकाळ नेतृत्व करताना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांत पारदर्शकता, संवेदनशीलता, जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी प्रयत्न केले. "पगारात भागवा" सारखा अनोखा उपक्रम राबवला. राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला. त्यांनी नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना मदतीसाठी पुढाकार घेऊन महासंघाच्या वतीने मदतीचा हात पुढे केला. ज्येष्ठ नेते कुलथे यांच्या निधनामुळे अधिकारी कर्मचारी प्रिय नेतृत्व गमावले आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आह त्यांचे कुटुंबियांच्या तसेच शासकीय अधिकारी-कर्मचाऱ्यांच्या संघटना पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत नेरूळ येथील शांतीधाम येथे श्री.कुलथे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी कुलथे कुटुंबियांसमवेत विविध शासकीय विभागातील अधिकारी-कर्मचारी, विविध संलग्न संघटनांचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.याप्रसंगी तृतीय श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष विश्वास काटकर, चतुर्थ श्रेणी कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष भाऊसाहेब पठाण, राजपत्रित अधिकारी महासंघाचे माजी अध्यक्ष रवींद्र धोंगडे, विद्यमान अध्यक्ष विनोद देसाई, सरचिटणीस समीर भाटकर, दुर्गा मंचच्या अध्यक्षा डॉ.सोनाली कदम, माजी माहिती संचालक देवेंद्र भुजबळ आदींनी यावेळी स्वर्गीय श्री.कुलथे यांच्याविषयीच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी उपस्थित सर्वांनी स्वर्गीय ग.दि.कुलथे यांचे संघटना चळवळीतील राहिलेले अपूर्ण कार्य त्याच तडफेने, प्रामाणिकपणाने पूर्ण करण्याचा संकल्प करून स्व. श्री.कुलथे यांना श्रद्धांजली वाहिली.

# रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्था पेणच्या चेअरमनपदी नंदकिशोर भगत यांची बिनविरोध निवड

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी**


रायगड जिल्हा ग्रामसेवक संघटनेत अतिशय उत्कृष्ट काम करणाऱ्या नंदकिशोर भगत यांची 20 संचालक असलेल्या रायगड जिल्हा ग्रामसेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे. या त्यांच्या निवडीबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे. मनमिळावू स्वभाव व कार्यतत्परता या गुणांसाठी ते रायगड जिल्हयात परिचित आहेत. ते ज्या ठिकाणीही आपले कर्तव्य बजावत असतात त्या ठिकाणी माणसे जोडण्याचे त्यांनी काम केले आहे. ग्रामसेवक म्हणून जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी ते नेहमीच तत्पर असतात. पतसंस्थेच्या चेअरमनपदालाही ते योग्य न्याय देतील यात शंका नाही. 17 नोव्हेंबर 1997 साली ते अलिबाग तालुक्यातील परहूर ग्रामपंचायतीमध्ये ग्रामसेवक पदी रुजू झाले. 1997 ते 2005 पर्यंत या ठिकाणी काम पाहिल्यानंतर त्यांनी अलिबाग तालुक्यातील चेंढरे , वेश्वी, पोयनाड, कुर्डूस, कुसुंबळे, शहाबाज आदी ग्रामपंचायतीमध्येही ग्रामसेवक पदी त्यांनी काम पाहिले. जवळपास अलिबाग तालुक्यातील सर्वच ग्रामपंचायतीमध्ये




त्यांनी काम पाहिले आहे. त्यानंतर 10 जून 2006 रोजी ग्रामविकास अधिकारी पदी त्यांची पदोन्नती झाली. चेंढरे येथे त्यांनी ग्रामविकास अधिकारी पदाचा पदभार स्विकारला. 2013 साली त्यांची बदली पनवेल तालुक्यातील पाली देवद सुकापूर येथे झाली. अनेक वर्षे त्यांनी अलिबाग सारख्या ग्रामीण भागात काम केल्यानंतर पनवेलसारख्या शहरी भागातही त्यांनी लवकरच जुळवून घेत आपल्या कामाची छाप पाडली. ग्रामसेवक म्हणून अतिशय उत्कृष्ट काम करत असल्यानेच त्यांची 2015 साली रायगड जिल्हा ग्रामसेवक संघटनेच्या जिल्हा सरचिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली. ही जबाबदारीही त्यांनी अतिशय उत्कृष्टरित्या पार पाडली. नुकतीच त्यांची विस्तार अधिकारी पदी पदोन्नती झाली असून ते सध्या अलिबाग येथे कार्यरत आहेत. ही पदोन्नती मिळते न मिळते तोच त्यांची रायगड जिल्हा ग्रामसेवक पतसंस्थेच्या चेअरमनपदी निवड झाल्याने हा एक दुग्धशर्करा योगच म्हणावा लागेल. त्यांनी आतापर्यंत केलेल्या प्रामाणिक कामाची त्यांना ही पोचपावतीच मिळाली आहे. त्यांची उत्तरोत्तर अशीच प्रगती होत राहो याच रायगड पनवेल साप्ताहिकाकडून त्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

# "फ्लाइंग फॉक्स फ्रुट बॅट" प्रजातीच्या 10 हजार वटवाघूळांची राज्यातील सर्वात मोठी "वस्ती

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड :-** जन मानसात वट वाघूळ या सस्तन व निशाचर जिवाबद्दल अवास्तव भीती नेहमीच राहिली आहे, त्यात च कोरोनाचा विषाणू वटवाघूळा मधून माणसात आला ही चायनीज बातमी जगात पसरली आणी जगभर वट वाघुळे मारण्याचा धडाका ही काही देशात सुरु झाला व भारतातही वटवाघळं वस्ती करतात अशी वड, पिंपळ, उंबर अशी मोठी व उंच झाडे तोडण्याचा सपाटा लागला होता. उलटी लटकणारी ही जैवविविधता शेती व जंगलाच्या संवर्धनासाठी व अन्न साखळी साठी मोलाची आहे. खेळणा धरणाजवळ सामाजिक वनविभाग सिल्लोडची रोप वाटिका आहे. तेथे उंबराची 70 ते 80 वर्षाची व सिसम, निलगिरीची उंच,मोठी 50 वर्ष वयाची अनेक झाडे आहेत. या झाडांवर 10 हजारांहून अधिक "इंडियन फ्लाइंग फॉक्स फ्रुट बॅट "या भारतीय प्रजातीची वाघळे 1985 पासुन वास्तव्य करुन आहेत.या वस्तीस "क्लाउड्रोन" म्हटले जाते. संध्याकाळ झाली कि ही वाघळे अन्नाच्या शोधात या झाडांपासुन दूर फळं खाण्यासाठी लांब लांब उडत जातात.ही वटवाघळे विविध देशी फळाचे रस चोखून बीज इतरत्र टाकतात व बीज प्रसार होऊन नवीन झाडे उगवतात. सिल्लोडच्या शेतीसाठी ही वाघळे मोलाची भूमिका बजाबतात ती म्हणजे " परागी भवणाची. फळं खातांना वनस्पतीचे पराग इकडून तिकडे वाहून नेले जातात व विविध पिकं, झाडे, वेली यांचे परागीभवन होते मगच शेतीतुन पिकं उत्तम बहरते व इतर जंगली झाडांची ही फलधारणा होन्यास मदत होते. ही वाघळे सकाळी 4च्या सुमारास या रोपं वाटीकेत परत येतात. जवळ धरण असल्यामुळे त्यांना इथे गारवा, पिण्यास पाणी मिळत असल्यामुळे इथे यांच्या 4 पिढ्या नांदल्या आहेत. जंगल व शेतीतील 40 टक्के झाडे ही वट वाघळानी उपरोक्त प्रकारे लावले आहे. येथील उंबराच्या एकेका झाडावर हजारो वाघळे वस्तीला असून उंबराची सर्व फळे ही वाघळे खाऊन बीज प्रसार करतात.

डॉ. संतोष पाटील करत आहेत एक वर्षां पासून अध्ययन - या वाघूळाच्या संवर्धन व अधिकृत नोंदी साठी वन्यजीव संवर्धक व अभिनव प्रतिष्ठानचे डॉ. पाटील हे कार्य करत आहेत. त्यांना ही वाघूळ वस्ती धरण भटकंती वेळी दिसली.त्यांनी गावच्या लोक जैव विविधता नोंद वहीत व झेड. एस.आय. कडे नोंद केली आहेत

ही फलाहरी वाघळे करतात वृक्षारोपण - ही देशी प्रजातीची वाघळे फक्त फलाहरी असून त्यांचे शास्त्रीय नाव "टेरोपस गिगँटस "असे आहे व वड, पिंपळ, उंबर, पिंपर आदी झाडांची लहान फळे ती खातात व त्यांच्या विष्टेतुन नैसर्गिक बीज प्रसार होतो व ही झाडे उगतात. जगातील आकाराने मोठया असणाऱ्या वाघळा पैकी ही एक आहेत.- डॉ. संतोष पाटील, सिल्लोड.

मधमाशां सोबत सहजीवन- इथे एका झाडावर मोहोळ असून वाघळांचीहि त्या फांदीवर वस्ती आहे. दोघे हि एकमेका सोबत मैत्री पूर्ण राहत आहेत.

शासनाच्या नर्सरीत नांदतेय निसर्गाची नर्सरी.. खेळना काठी या एकाच ठिकाणी 10 हजाराहून अधिक वट वाघळे अधिवास करतात ( रुस्टिंग ). सर्वच झाडे, शेती पिकं, वेली यांचे परागीभवन वट वाघळे, मधमाशा, फुलपाखरे, पक्षी आदि मार्फत होते त्या पैकी 20 टक्के खारीचा "वाटा " वट वाघळे यांना जातो. यावर डॉ. संतोष पाटील यांचा " indian pteropus gigantues - key stone species for echosystem of ajintha mountain range. इंडियन टेरोपस जिगँटीयस - कि स्टोन स्पेसिस फॉर इकोसिस्टीम ऑफ अजिंठा माऊंटन रेंज" हा शोध निबंध "जर्नल ऑफ वाईल्ड लाइफ अँड बायो डायवर्सीटी" या शोध पत्रिकेला पाठवण्यात आला आहे.

## रेवदंडा हायस्कूल परिसरात ‘कुत्रा राज’; नागरिक भयभीत, कुत्रे बिनधास्त

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**



एकीकडे रेवदंड्याचं समुद्रकिनारे पर्यटकांचं आकर्षण ठरतंय, तर दुसरीकडे त्या किनाऱ्यावर आणि हायस्कूलच्या परिसरात ‘भटक्या कुत्र्यांचं साम्राज्य’ विस्तारत चाललंय. इथे आता गावकरी चालतात सावधपणे आणि कुत्रे फिरतात मस्तपणे! दररोज सकाळी विद्यार्थी शाळेकडे जाताना कुत्र्यांची नजर चुकवत, पिशवी पुढे धरून, गुपचूपपणे सरकत जातात – जणू काही गुप्त ऑपरेशन चालू असावं! एका विद्यार्थ्याने सांगितलं, “कुत्रे पाहून पाय थरथरतात. काही वेळा वाटतं, शाळा बंदच असावी!”काही कुत्र्यांनी तर हायस्कूलच्या आवारात ‘रेग्युलर बैठका’ घालायला सुरुवात केली आहे. एका शाळकरी मुलीच्या म्हणण्यानुसार, “गेल्या आठवड्यात एक कुत्रा वर्गात शिरला... वाटलं की ‘गेस्ट लेक्चर’ घ्यायला आलाय!” या पार्श्वभूमीवर, हल्ली टीव्हीवर वारंवार दाखवल्या जाणाऱ्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या बातम्यांचा परिणाम गावात स्पष्टपणे दिसतो आहे. विशेषतः महिलावर्ग आणि वयोवृद्ध नागरिक अधिक भयभीत झाले आहेत. "कुठे ना कुठे एखादा कुत्रा कोणाला तरी चावतच आहे," असं सतत पाहिल्यावर भीती अजून वाढते, असं एका महिलेनं सांगितलं. ग्रामस्थांनी जरी अजून थेट तक्रार केली नसेल, तरीही ग्रामपंचायतीने स्वतःहून लक्ष घालून या मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करणे गरजेचे आहे. गावातील जेष्ठ आणि सुज्ञ नागरिक याबाबत चिंतेत असून ते म्हणतात, “आज हे कुत्रे शाळेत फिरतात, उद्या घरात शिरले तर? प्रशासनाने वेळेत पावलं उचलली नाही तर परिणाम गंभीर होऊ शकतात. “आम्ही सांगतो तेवढंच कुत्र्यांना हटवा, नाहीतर गाव सोडू!” असं संतप्त आजीबाई म्हणाल्या. पर्यटकांचं काय, ते फोटो काढून निघून जातात. पण गावकऱ्यांचं काय? रोज सकाळी हे कुत्रे ‘व्हीआयपी एंट्री’सारखे वावरणं चालू ठेवतात, आणि गावकरी मात्र सैरभैर !या सर्व परिस्थितीवरून एवढं मात्र स्पष्ट आहे – भटक्या कुत्र्यांच्या वाढत्या त्रासावर नियंत्रण आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने आता कठोर पावलं उचलणं गरजेचं झालं आहे. अन्यथा रेवदंड्यासारख्या गावात भय आणि असुरक्षिततेचं वातावरण अधिक गडद होईल.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST- RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## राळेगाव आणि वडकी येथे महायुती सरकारच्या निवडणूक जाहीरनाम्याची होळी

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**

**राळेगाव** : महायुती पक्षाने २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत मताचा जोगवा मागताना शेतकऱ्याची संपूर्ण कर्जमुक्ती सातबारा कोरा,सोयाबीनला ६०००रुपये भाव,लाडक्या बहिणीला २१०० रुपये,शेती कर माफ, इत्यादी आश्वासने निवडणूक जाहीरनाम्यात व जाहीर सभांमधून दिले होते,परंतु १० मार्च २०२५ ला अर्थसंकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची तरतूद करण्यात आलेली नाही उलट शेतकऱ्यांनी कर्ज भरावे असे जाहीर करून कर्ज वसुली सक्तीच्या नोटीचा पाठविल्या याचा निषेध म्हणून आज भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती दिनाचे औचित्य साधून माहिती सरकारच्या फसव्या जाहीरनामाची शेतकरी संघटना व स्वतंत्र भारत पक्षाच्या वतीने होळी करण्यात आली यावेळी जिल्हाध्यक्ष राजेंद्र झोटीग, युवा अध्यक्ष अक्षय महाजन,ज्येष्ठ नेते सुरेशराव आगलावे, तालुका अध्यक्ष गिरीश तुर्के, गोपाल भोयर, गजानन कोल्हे, प्रदीप भोयर, गजानन पारखी, गजानन ठाकरे, श्रीहरी राजुरकर, सौरभ महाजन, भास्कर पाटील, सुरेश झोटींग, नामदेव राजूरकर, हनुमान चिडे, अशोक वाभीटकर, मारोतराव कावडे, प्रकाश चिडे, रवींद्र खिरटकर, बबनराव ठाकरे, विठ्ठल येडगरे, प्रभाकर भोयर इत्यादी शेतकरी उपस्थित होते.




## सह्याद्री आदिवासी ठाकर ठाकूर महाराष्ट्र राज्य संघटनेची सभा उभाडे येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**पनवेल/प्रतिनिधी :**

सह्याद्री ठाकर ठाकूर महाराष्ट्र राज्य संघटनेची सभा उभाडे येथे सोमवार (दि. १४ एप्रिल) आयोजित केली होती. या सभेचे अध्यक्ष स्थानी शहापूरचे आमदार व महाराष्ट्र राज्य सह्याद्री ठाकर ठाकूर संघटनेचे अध्यक्ष तथा अनुसूचित जमाती कल्याण समितीचे प्रमुख (राज्य मंत्री दर्जा) आ. दौलत दरोडा होते. या महाराष्ट्र राज्य कमिटी मिटिंगला अनेक जिल्हातुन पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित राहवून संघटनेचे अध्यक्ष, राज्य मंत्री दर्जा आमदार दौलत दरोडा, उपाध्यक्ष माजी आमदार काशिनाथ मेंगाळ, सचिव माजी आमादर गांगड बाबा, महाराष्ट्र राज्य संपर्क प्रमुख तथा ठाणे जिल्हाध्यक्ष जानू हिरवे यांच्या उपस्थिती आदिवासी ठाकर ठाकूर समाजाच्या प्रश्न, अडचणीवर चर्चा करण्यात आली. नंतर महाराष्ट्र राज्य कमिटीवर सदस्यांची व काही जिल्हामध्ये जिल्हाध्यक्ष पदांची नियुक्ती करण्यात आली. यामध्ये महाराष्ट्र राज्य



संघटनेच्या सदस्य दत्तात्रय महादू बरोरा, भास्कर जाधव, एकनाथ झुगारे, गंगाराम मेंगाळ, सीताबाई पथवे यांची नियुक्ती करण्यात आली. तर जळगाव जिल्हाध्यक्ष रामनाथ मेंगाळ, संभाजी नगर जिल्हाध्यक्ष श्रावण दोरे, नाशिक जिल्हाध्यक्ष संजय लोते, पालघर जिल्हाध्यक्ष एकनाथ दरोडा, पुणे जिल्हाध्यक्ष संजय मोघे यांची नियुक्ती करण्यात आली. यावेळी महाराष्ट्र राज्य संघटनेचे सल्लागार सुधाकर मेंगाळ,भाऊराव उघडे, शिवाजी मेंगाळ, पत्रकार गणपत वारगडा, राजू गांगड, जयवंत शिद, मारुती आघाण, सोनू मेंगाळ, अजय कडाली, पांडुरंग कातवारे, राजू पोकळा, जानू शिंगवा, नथू गांगडसह सर्व पदाधिकारी व शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

## बालमोहन विद्यामंदिर (CBSE), दादर येथे नर्सरीचा पहिला दिवस उत्साहात साजरा

**प्रतिनिधी - मयूर प्रकाश धुरी ।**

**दादर,** दादरमधील प्रसिद्ध बालमोहन विद्यामंदिर (CBSE विभाग) येथे आज नर्सरीची नविन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी विद्यार्थ्यांमध्ये आणि पालकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला. अनेक पालकांनी आपल्या चिमुकल्यांना शाळेच्या पहिल्या दिवशी सोडताना आनंदाने आणि थोड्या उत्सुकतेने सहभाग नोंदवला.






शाळेच्या गणवेशात सजलेली लहान मुले, त्यांच्या खांद्यावर असलेली छोटे दप्तर आणि चेहऱ्यावरचे निरागस हावभाव वातावरणात एक वेगळाच सकारात्मक ऊर्जा घेऊन आले होते. शाळेच्या प्रशासनाने विद्यार्थ्यांचे स्वागत अत्यंत सुयोग्य रितीने केले असून, पहिल्या दिवशी मुलांनी खेळ, गाणी आणि ओळखीच्या उपक्रमांच्या माध्यमातून शाळेचा अनुभव घेतला.

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य अन्नदान वाटपाचा कार्यक्रम

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी**
**चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

**नांदेड** : भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपा महिला मोर्चा प्रदेश सचिव तथा माजी जिल्हा परिषद सभापती अनिता हिंगोले यांच्या वतीने भव्य अन्नदान वाटपाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. यावेळी माजी मुख्यमंत्री तथा खा.अशोकराव चव्हाण, आ.श्रीजयाताई चव्हाण, महानगर अध्यक्ष तथा मा. आ. अमरनाथ राजूरकर, जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, मंगला निमकर, कविता कळसकर, जयक्षी तोडकरी, अरुणा पुरी, कृउबा सभापती संजय देशमुख लहानकर, माजी महानगर अध्यक्ष प्रविण साले, प्रदेश कार्य सदस्य ॲड चैतन्य बापू देशमुख, किशोर स्वामी, विजय येवनकर, महेश बाळू खोमणे, बालाजी सूर्यवंशी, माजी नगरसेवक महेंद्र पिंपळे, शितल खांडील, स. दिलीपसिंघ सोडी, सुरेश लोट, भालचंद्र पवळे, संतोष मुळे, शशिकांत क्षीरसागर आदी पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.






## घाटंजी तालुक्यातील पारवा सर्कल पेट्रोल पंप जवळ मृत्यूचा सापळा!

### पारवा सर्कलः इथे इंधन नाही, मृत्यू ओतला जातो!

**दैनिक युवक आधार घाटंजी (प्रतिनिधी - महेश पेंन्दोर)**

**घाटंजी**: पारवा सर्कल येथील जयस्वाल पेट्रोल पंप जवळ आता केवळ इंधनाचा नाही, तर मृत्यूचाही अड्डा बनला आहे! गेल्या काही दिवसांपासून या धोकादायक ठिकाणी अपघातांची मालिका सुरूच आहे आणि आता तर दोन निष्पाप जीवांचा बळी गेला आहे. दिवसरात्र हजारो वाहनांची वर्दळ असलेल्या या मार्गावर या संबंधित विभागाच्या घोर दुर्लक्षामुळे हा जीवघेणा अपघात ओढवला, असा संतापजनक आरोप नागरिक करत आहेत. एकाच ठिकाणी दोन दिवस अपघात झाल्याने परिस्थिती अधिक गंभीर बनली आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या धोकादायक वळणावर योग्य उपाययोजना करण्याची मागणी वारंवार करण्यात आली, मात्र या संबंधित विभागाने याकडे पूर्णपणे दुर्लक्ष केले. याच निष्काळजीपणाचा परिणाम म्हणजे दोन लोकांचे अकाली निधन झाले आहे. पेट्रोल पंपाजवळ असलेल्या या धोकादायक वळणावर गतिरोधक (speed breakers) किंवा स्पष्ट दिशादर्शक फलक लावण्याची साधी गरजही या संबंधित विभागाने पूर्ण केली नाही. यामुळे भरधाव वेगात येणाऱ्या वाहनांना अंदाज येत नाही आणि ते अपघातांना बळी पडतात. आता दोन लोकांच्या मृत्यूनंतर तरी संबंधीत विभागाला जाग येणार का,? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत. परिसरातील नागरिकांनी तातडीने या जागेची पाहणी करून ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे. केवळ दिखाऊ पाहणी न करता, तातडीने गतिरोधक बसवणे, योग्य सूचना फलक लावणे आणि आवश्यक असल्यास या धोकादायक वळणाच्या रचनेत बदल करण्याची मागणी जोर धरत आहे. दोन निष्पाप जीवांच्या मृत्यूनंतर तरी या संबंधित विभाग आपले डोळे उघडणार का?

आणखी किती बळी गेल्यावर या 'मृत्यूच्या सापळ्या'वर उपाययोजना केली जाणार? या गंभीर प्रश्नांची उत्तरे आता संबंधित विभागाला द्यावीच लागतील! निष्काळजीपणामुळे झालेल्या या दुर्दैवी घटनांसाठी जबाबदार कोण.? असा आक्रोश आता पारवा सर्कलमध्ये घुमत आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची...134.वि. जयंती मोठ्या उत्साहात साजरी ..,

**दैनिक युवक आधार**
**... रिसोड प्रतिनिधी**
**रणजीत सिंह ठाकुर .,.**

जिल्हा परिषद शाळेच्या वतीने पुन्हा एकदा वरूड नगरीत निळ वादळ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती मोठ्या उत्सवात साजरी शाळेचे मुख्याध्यापक ब्रह्मानंद वानखडे सर शिक्षक शंकर बोरकर सर यांनी आपल्या शाळेमधुन रॅली काढण्यात आली बाबासाहेब आंबेडकर यांच्या फोटोंचे पूजन करण्यात आले कार्यक्रमासाठी गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य ,पोलीस पाटील, तंटामुक्ती अध्यक्ष ,शाळा व्यवस्थापन समिती, अंगणवाडी सेविका, आरोग्य सेविका व गावातील प्रतिष्ठित नागरिक महिला मंडळ व सर्व गावकरी मंडळी यांचे उपस्थिती बोरकर सर यांनी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनगाथेवर प्रकाश टाकला शाळेमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले वक्तृत्व स्पर्धा रांगोळी स्पर्धा व नंतर रॅली ला सुरुवात केली सर्व विद्यार्थ्यांना निळे फेटे बांधून कार्यक्रमास सुरुवात केली वरुड नगरीत जय शिवराय जय भिम च्या घोषणा गुंजल्या प्रत्यक्ष डॉ बाबासाहेब आंबेडकर व माता रमाई आपल्या विद्यार्थ्यांच्या रूपाने सर्व गावकऱ्यांच्या



समोर उभे केले त्या दोघांना बघून गावकऱ्यांची डोळे पाणवले या दोघांनी भूमिका साकारल्याने नागरिकांनी जणू प्रत्यक्ष बाबासाहेब व रमाई चे दर्शन घडवून आले चौका चौकात भीमराज कि बेटी, नांदन नांदन माझा रमाच, भीत नाही कोणाच्या बापाला हे भिमाची पोर, तुम्ही खाता त्या भाकरीवर बाबासाहेबांची सही आहे रे या गाण्यावर नृत्य करून गावकऱ्यांचे मन जिंकले विद्यार्थ्यांनी लेझीम लाठी काठी प्रदर्शित केली शिका संघटित व्हा व संघर्ष करा शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे हा आवाज गल्लोगल्ली विद्यार्थ्यांनी गाजवला जागोजागी गावकरी मंडळींनी विद्यार्थ्यांना वेगवेगळे खाऊ व पिण्याचा पाण्याचे व्यवस्था केली बाबासाहेब आंबेडकर व रमाईची भूमिका साकारणाऱ्या विद्यार्थ्यांना एलआयसी एजंट कडून भारतीय संविधान पुस्तक सप्रेम भेट म्हणून देण्यात आले शाक्य मुनी बौद्ध विहारातर्फे विद्यार्थ्याला व उपस्थित सर्व गावकरी मंडळींना नाश्त्याची व्यवस्था करण्यात आली वरुड तोफा येथे नेहमीच एकता व अखंडता बघायला मिळते सर्व जाती धर्माचे लोक एकत्रित गोडी गोविंदाने सर्व सन व उत्सव साजरी करतात विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक व बौद्धिक विकासाबरोबरच हे शिक्षक सामाजिक विकासावरही भर देत आहेत या दोन्ही शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्कार मिळावा म्हणून सर्व गावकरी मंडळी शिफारस करणार असल्याची ही चर्चा होत आहे (महिला मुक्ती मोर्चा संघटन उपाध्यक्ष) प्रवीण विश्वनाथ वानखडे

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची कामे तातडीने पूर्ण करा - संभाजी माळवदे

### अहिल्यानगरच्या कार्यकारी अभियंता कार्यालयास टाळे ठोकण्याचा ईशारा

**दैनिक युवक आधार**
**(नेवासा प्रतिनिधीः- लखन वाल्हेकर)**

नेवासा तालुक्यातील तसेच जिल्ह्यातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणची कामे तातडीने पूर्ण करा व कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करा अन्यथा अहिल्यानगर येथील कार्यकारी अभियंता कार्यालयास टाळे ठोकण्याचा ईशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी निवेदनाद्वारे दिला.

अहिल्यानगर जिल्ह्यात व नेवासा तालुक्यात पाणी पुरवठ्याची हजारो कोटीची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अंतर्गत सुरु आहे. यात सात ते दहा गावे मिळून एक योजना अशा योजनाची कामे सुरु आहेत. यात पाणी साठवण टाक्या,पाण्याच्या सोअर्स पासून गावापर्यंत पाईप लाईन टाकणे , गावातील अंतर्गत पाईप लाईन टाकणे अशा कामाचा समावेश आहे. मोठया करोडोच्या बजेटची कामे असणाऱ्या या योजना काही केल्याने पूर्णत्वास जाण्यासाठी तयार नाही. या योजनाचा पूर्णत्वाचा कालावधी देखील उलटून गेला आहे. कालावधी उलटून वर्ष होण्यास आली आहेत. टाक्यांचे कामे अपूर्ण आहेत. पाणी सोअर्स पासून पाईप लाईन टाकण्याचे काम अपूर्ण आहे.गावातील अंतर्गत लाईन टाकण्यास सुरुवातच झाली नाही याला कारण म्हणजे ठेकेदारांचा हलगर्जीपणा व यांना पाठीशी घालणारे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणचे अधिकारी. कामे पूर्ण नं झाल्याने ऐन उन्हाळ्यात नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी झगडाव लागत आहे. हजारो कोटीच्या योजना, कोटीच्या कोटी बिले काढून सुद्धा काम अपूर्णच.या सर्व कारभाराची दखल घेत महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी अहिल्यानगर येथे एमजेपीचे कार्यकारी अभियंता यांची भेट घेऊन नेवासा तालुक्यातील जीवन प्राधिकरणची कामे तातडीने सुरु करा तसेच मागील पाच वर्षात जी कामे केली आहेत त्या कामाची गुणवत्ता तपासणी करण्यात यावी, सद्यस्थितीत सुरु असलेल्या कामास विलंब करणाऱ्या ठेकेदारावर कठोर कारवाई करण्याची मागणी निवेदन द्वारे केली. वेळीच कारवाई न केल्यास अहिल्यानगर येथील एमजेपीच्या कार्यालयास टाळे ठोकून कार्यालयसमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा ईशारा यावेळी कार्यकारी अभियंता यांना लेखी निवेदन देऊन दिला. निवेदनावेळी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे संभाजी माळवदे,नेवासा काँग्रेसचे शहराध्यक्ष अंजुम पटेल, बसपाचे युवा नेते हरीश चक्रनारायण, गुलाब पठाण, काँग्रेस उपाध्यक्ष सतीश तऱ्हाळ,भारतीय स्वाभिमानी संघांचे गणपत मोरे, काँग्रेसचे संदीप मोटे आदी उपस्थित होते.



## मयुरेश खारीक बेपत्ता

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

राहत्या घरातून कोणाला काहीही न सांगता मयुरेश प्रवीण खारीक (१८, राहणार मानसी हाइट्स, सेक्टर आठ, नवीन पनवेल) हा निघून गेल्याने तो हरवला असल्याची तक्रार खांदेश्वर पोलीस ठाण्यात करण्यात आली. त्याची उंची 5.6 फिट, रंग गोरा, नाक सरळ आहे. त्याने अंगात पिवळ्या रंगाचा हाफ बाह्यांचा टी शर्ट आणि कमरेला राखाडी रंगाची बरमुडा पॅन्ट घातली आहे. या तरुणाबाबत अधिक माहिती असल्यास पोलीस नाईक प्रकाश ओंबासे यांच्याशी संपर्क साधावा



## परतुर रेल्वे स्टेशन येथे केले महामानवाला अभिवादन..

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

भारतीय घटनेचे शिल्पकार, महामानव, बोधिसत्व, परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा १३४ वा जयंती उत्सव सोहळा आर.सी.सी. मित्र मंडळ व पंचशील मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने परतुर रेल्वे स्टेशन येथे साजरा करण्यात आला होता.यावेळी परतुर रेल्वे स्टेशनचे मुख्य स्टेशन अधीक्षक राजेश गुप्ता,आर. पी.एफचे विजय वाघ व सिनिअर बुकिंग क्लार्क संजय गाडगे व झुंगाराम साळवे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले या वेळी वंचित बहुजन आघाडीचे नेते रामप्रसाद थोरात सर व वंचित बहुजन आघाडीचे माजी जिल्हा अध्यक्ष गौतम खंडागळे यांच्या हस्ते पंचशील ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. नंतर रामप्रसाद थोरात सर यांनी उपस्थिताना मार्गदर्शन केले. यावेळी जयंती समितीचे अध्यक्ष अशोक ठोके, उपाध्यक्ष राहुल नाटकर, कोषाध्यक्ष दीपक हिवाळे, सचिव रवि इंगळे, प्रदिप साळवे,संघटक स्वप्निल पहाडे, नितीन साळवे, नितीन खरात, रमेश कदम, संतोष कदम, विकास साळवे, गोरख कदम, विजय गायकवाड, संजय गोमाजी गायकवाड, संजय गायकवाड, दिलीप साळवे, दीपक साळवे, मारी साळवे, रोहन अंभोरे, विजय अंभोरे अशोक पाईकराव, सुशांत दवंडे, पत्रकार प्रभाकर प्रधान, प्रकाश वाघ, अशोक साळवे, गुलाब दवंडे, धम्म खंडागळे, केतन खंदारे, कुमार लांडगे, गौरव गायकवाड, रामेश्वर वंजारे,पत्रकार राज भदर्गे, अशोक दवंडे,विकी बासनवाल यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी खूप परिश्रम घेतले. सूत्र संचालन विकास वेडेकर यांनी केले.सायंकाळी ठीक सहा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेची भव्य मिरवणूक काढण्यात आली ही मिरवणूक संविधान चौक रेल्वे स्टेशन परतुर येथून ते तहसील कार्यालय येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्याच्या नियोजित जागी जयंतीची सांगता झाली यावेळी आंबेडकरी अनुयायांमध्ये अत्यंत उत्साहाचे वातावरण होते. भिंमगीतांच्या तालावार अत्यंत जल्लोषात आंबेडकरी अनुयायी आपल्या बाबासाहेबांच्या



जयंतीत नाचत होते. या वेळी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा "विजय असो", बाळासाहेब आंबेडकर तुम आगे बढो हम तुम्हारे साथ है ",वंचित बहुजन आघाडीचा विजय असो", या घोषणांनी परिश्रम दुमदुमून गेला होता. यावेळी भारतीय बौद्ध महासभेचे तालुका अध्यक्ष रामचंद्र पानवाले व हेमंत पहाडे यांनी व समता सैनिक दलाने व पोलिसांनी देखील सहकार्य केले.

## सुपे सातकरवाडी येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**खेड पुणे.**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती सुपे - सातकरवाडी गावामध्ये साजरी. 14 एप्रिल 2025 रोजी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 134 वी जयंती सुपे गावठाण येथे खूप छ्यान पद्धतीने साजरी करण्यात आली. मा. अरुण चांभारे संचालक पुणे जिल्हा सह-दुध उत्पादक संघ यांनी सुपे गावठाणात डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा उभारण्यात खुप मोठे योगदान दिले व माजी आमदार दिलीप आन्ना मोहिते पाटील यांच्या मदतीने ग्रामपंचायत च्या सहकार्याने पुतळा परीसर कॉक्रींट करुण सुशोभित करण्यात आला त्या मुळे डॉ बाबासाहेब आंबेडकर जयंती सोहळा उत्साहात साजरा केला गेला ह्या कार्यक्रमा साठी अरुण चांभारे साहेब रामचंद्र शिंगाडे सभापती खेड ता.शिक्षक सह-पत संस्था तसेच प्रथम लोकनियुक्त सरपंच सौ सुमित्रा सचिन चांभारे,उपसरपचं अरुण पिसाळ,ग्रा पं सदस्या सौ सविता संजय खेडेकर सौ कांताबाई नामदेव बुढे उपस्थित होते या कार्यक्रमास सहकार्य राजे शिवछत्रपती प्रतिष्ठान सातकरवाडी, सुपे,



सर्व सदस्य यांचं संकल्पनेतून महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचं विचार लोकांपर्यंत पोहचवण्याचं काम त्यांनी केले प्रभोधनकार सतीश यानभुरे सर यांनी बाबासाहेब यांचे जिवन ,विचार, कायदा, आणि सुव्यवस्था यांचे बद्दल खूप छ्यान व्याख्यान दिले. अरुण चांभारे यांनी शिका संघटीत वहा संघर्ष करा या विषयावर विचार व्यक्त केले व कु. आर्या विजय खंडागळे हिने सुद्धा खूप सूंदर असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विषयी विचार मांडले. सकाळी सार्वजनिक बौद्ध पूजा करण्यात आली. ह्या कार्यक्रमासाठी उपस्थित निवृत्त पोलीस अधिकारी दत्तात्रय चांभारे, अक्षय राऊत, मछींद्र सातकर कर, सुरेश घुले सरकार, आव्हाड सर, उल्हास मुके - अध्यक्ष मुंबई डब्बेवाले, साहेबराव सातकर, अध्यक्ष - सुपे तंटा मुक्ती, ह. भ. प. नदराज मोहन, सखुबाई मुके, गबाजी मोहन, कचरू मोहन, दाजीराम मोहन, तुकाराम मोहन, अंगणवडी सेविका बुढे मॅडम, गंगुबाई मोहन ,सतीश मोहन, मधुकर नवले, यांनी सर्वांनी उपस्थिती राहून कार्यक्रम ची शोभा वाढवली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते राजु ससाणे , शंकर ससाणे ,सयाजी ससाणे, कैलास ससाणे,पांडुरंग भालेराव,सुनील गायकवाड रामदास ससाणे, मनोहर गायकवाड, तुषार गायकवाड, रमाई महिला मंडळाच्या सौ छाया ससाणे सौ मंजु ससाणे, हिराबाई ससाणे, विद्या गायकवाड, सिंधु ससाणे मा. ग्रा. पं. सदस्य, गीता भालेराव, रुपाली गायकवाड, सिधुबाई सयाजी ससाणे, व इतर महिला भगिनींनी यांनी जेवणासाठी योगदान दिले. पाईट पोलीस ठाणे यांनी बंदोबस्त साठी नियोजन केले. सूत्रसंचालन कु. अविका राजू ससाणे यांनी केले व, कु. राणी कैलास ससाणे यांनी सर्वांचे आभार मानले. खेळीमेळीच्या वातावरणात कार्यक्रम संपन्न झाला.

## शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडे होरपळून जाताहेत, वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडलाय...

**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी)**

– दरवर्षी रब्बी हंगामातील ज्वारीचे, गव्हाचे पिक निघाल्यानंतर शेतीची मशागत सुरू होते. या दरम्यान शेतकरी आपल्या शेतात खत टाकणे, नांगरणी करणे आदी कामे करतात. या दरम्यान ज्वारी ,गव्हाचा खोडवा नष्ट करण्यासाठी शेताच्या कडेला असलेल्या ताली पेटवुन देतात. रस्त्यालगत असणाऱ्या शेतजमीन मालकांकडून लावलेल्या आगीत झाडे होरपळून निघतात.झाडांची मोठी हानी होते. "झाडे लावा,झाडे जगवा"पाणी अडवा पाणी जिरवा " अशा आपण दिलेल्या घोषणा हवेतच विसरतात त्याची अंमलबजावणी किती प्रमाणात होते याचा विचार केला जात नाही. ग्रामीण भागातील शेतकरी पिकांना वसवा नको म्हणून बांधावरील झाडे तोडतात. उष्णतेचा दाह वाढल्याने हवामान आणि पृथ्वीच्या तापमानावर दुष्परिणाम होतो. त्या मुळे शेतकऱ्यांनी खोडवा जाळताना बांधावरील झाडांना ईजा होणार नाही याची काळजी घ्यावी असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी केले आहे.

–चौकट–

वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे संत तुकारामांच्या अभंगाचा विसर पडला आहे. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या वृक्षसंपदेचे, वनसंपदेचे महत्व पटवुन देणाऱ्या जगद्गुरू संत तुकाराम महाराजांच्या अभंगाचा आपल्याला विसर पडला असुन तो अंगिकारला तरच पुढील पिढ्या सुखाने आनंदाने जगतील. माणसाला सुसह्यपणे जगण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडांची लागवड करणे गरजेचे आहे. पुर्वी रस्त्याच्या बाजूला वडाची, पिंपळाची, लिंबाची मोठमोठाली झाडं असायची. त्या मुळे रस्त्याने जाताना थंडावा जाणवायचा मात्र आता रस्ता रुंदीकरणाच्या नावाखाली अनेक मोठमोठाल्या वृक्षांची कत्तल करण्यात आली आहे. तोडण्यात आलेली झाडे पुन्हा लावण्यात येत नाहीत.

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**(सामाजिक कार्यकर्ते)**



# किरकोळ महागाईचा सहा वर्षांचा नीचांक

**मार्चमध्ये 3.34 टक्क्यांच्या जवळपास**

**नवी दिल्ली :** भाजीपाला आणि प्रथिनेयुक्त पदार्थांच्या किमतीत झालेल्या घसरणीमुळे मार्चमध्ये किरकोळ महागाई ३.३४ टक्क्यांच्या जवळपास सहा वर्षांच्या नीचांकी पातळीवर आली.

ग्राहक किंमत निर्देशांक (सीपीआय) आधारित किरकोळ महागाई दर फेब्रुवारीमध्ये ३.६१ टक्के आणि गेल्या वर्षी मार्चमध्ये ४.८५ टक्के होती.

मार्च २०२५ मधील महागाई दर ऑगस्ट २०१९ नंतर सर्वात कमी आहे, जेव्हा तो ३.२८ टक्के होता. अन्नधान्य चलनवाढीचा दर फेब्रुवारीमधील ३.७५ टक्के आणि मार्च २०२४ मध्ये ८.५२ टक्क्यांच्या तुलनेत मार्चमध्ये २.६९ टक्के होता.

गेल्या आठवड्यात, रिझर्व्ह बँकेने महागाई कमी करण्याच्या पार्श्वभूमीवर मुख्य अल्प-मुदतीच्या कर्ज दरात (रेपो) २५ आधार अंकांनी कपात केली. रिझर्व्ह बँकेने चालू आर्थिक वर्ष २०२५-२६ साठी सीपीआय महागाई दर ४ टक्के, पहिली तिमाही ३.६ टक्के, दुसरी तिमाही ३.९ टक्के, तिसरी तिमाही ३.८ टक्के आणि चौथ्या तिमाहीमध्ये ४.४ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. जोखीम समान रीतीने संतुलित आहेत.

डब्ल्यूपीआय आकडेवारीनुसार, अन्नधान्य महागाई फेब्रुवारीमधील ३.३८ टक्क्यांवरून मार्चमध्ये १.५७ टक्क्यांवर कमी झाली. दरम्यान, भाजीपाला, बटाटे आणि इतर खाद्यपदार्थांच्या किमती कमी झाल्यामुळे घाऊक महागाईचा दर मार्चमध्ये घसरला. फेब्रुवारीमध्ये ५.८० टक्क्यांच्या तुलनेत या महिन्यात भाज्यांची चलनवाढ १५.८८ टक्के होती.

फेब्रुवारीमध्ये २.८६ टक्क्यांच्या तुलनेत मार्चमध्ये उत्पादित उत्पादनांची महागाई ३.०७ टक्क्यांनी वाढली. इंधन आणि ऊर्जेतही मार्चमध्ये महागाईचा दर ०.२० टक्क्यांनी वाढला होता, तर फेब्रुवारीमध्ये ०.७१ टक्क्यांनी चलनवाढ झाली होती.



### घाऊक महागाई चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर

**मार्चमध्ये 2.05 टक्क्यांवर**

घाऊक महागाईचा दर मार्चमध्ये २.०५ टक्क्यांवर घसरला असून फेब्रुवारीमध्ये तो २.३८ टक्क्यांवर होता, अशी सरकारी आकडेवारी मंगळवारी जाही झाली. घाऊक महागाई आता चार महिन्यांच्या नीचांकी पातळीवर आली आहे. घाऊक किंमत निर्देशांक (WPI) आधारित महागाई दर वार्षिक आधारावर मात्र वाढला. मार्च २०२४ मध्ये तो ०.२६ टक्के होता. मार्च, २०२५ मध्ये चलनवाढीचा सकारात्मक दर प्रामुख्याने अन्न उत्पादने, इतर उत्पादन, खाद्यपदार्थ, वीज आणि कापड उत्पादन इत्यादींच्या किमतींमध्ये वाढ झाल्यामुळे आहे, उद्योग मंत्रालयाने एका निवेदनात म्हटले आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यात

### आपण अपयशस्वी ठरलो : प्रा.डॉ. एम.सी.सोनवले.

**दैनिक युवक आधार**
**कॉलेज कट्टा/आरती सुरवसे**

वाजेकर कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती साजरी करण्यात आली.जयंती निमित्त "डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या स्वप्नातील भारत" याविषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.प्रा.डॉ.एम.सी.सोनवले यांनी आपल्या व्याख्यानातून बाबासाहेबांचे स्वंतत्र भारत कसा असेल यावर विवेचन केले. स्वातंत्र्य मिळाल्यावर नवभारताची निर्मिती कशी करायची या विषयी आपले मत मांडताना ते म्हणतात की भारत हा समता,बंधुता,स्वातंत्र्य या मूल्यावर उभा असणारा भारत बाबासाहेबाना हवा होता.बाबासाहेबानी संविधानासारखा मूल्यवान दस्तऐवज दिला पण गेल्या 75 वर्षात संविधानानुसार प्रामाणिकपणे अंमलबजावणी न झाल्याने आजही 85 टक्के बहुजन समाज विकास प्रक्रियेपासून वंचित राहिल्याने भारतीय समाज अनेक यातना सहन करीत आहे. आजही बाबासाहेबानी सांगितलेले सार्वत्रिक व गुणवत्तापूर्ण शिक्षणाचे महत्त्व धोरणकर्ते राबवताना दिसत नाहीत.डॉ.बाबासाहेबानी सांगितलेले गुणवत्तापूर्ण शिक्षण मानायला तयार नाहीत असेही मत त्यांनी यावेळीव्यक्त केले.



महाविद्यालयाचे प्रभारी,प्राचार्य डॉ.आमोद ठक्कर आपल्या अध्यक्षीय मनोगतातून व्यक्त करताना म्हणाले की डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेला 'शिका,संगठित व्हा व संघर्ष करा' हा मूलमंत्र घेऊन आजच्या सुशिक्षित तरुणांनी वाटचाल केल्यास येणारी आव्हाने सक्षमपणे पेलू शकतील.तसेच राष्ट्र उभारणीत महत्त्वाचे योगदान देऊ शकतील. प्रा.राम गोसावी यांनी आपल्या प्रास्ताविकात म्हटले की अजूनही भारतातील धोरणकर्त्यांना बहुजनांचे शिक्षण हे अनुत्पादक वाटत असल्याने शिक्षण संपविण्याचे कटकारस्थान चालू आहे.शिक्षण ही देशातील प्रत्येक नागरिकाची मूलभूत गरज आहे,ती सेवा आहे,हे विसरून आजच्या धोरणकर्त्यांना शिक्षणाचे व्यवसायिकरण करून टाकले आहे. कार्यक्र मासउपप्राचार्य प्रा.गजानन चव्हाण, डॉ.झेलम झेंडे,डॉ.राजकुमार कांबळे,प्रा. भूषण ठाकूर,प्रा.अर्जुन पाटील तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचे व राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते.

## स्वातंत्र्य सैनिक पं.ध.थेपडे म्हसावद विद्यालयाची गौरवास्पद निवड

दैनिक युवक आधार
जळगाव जिल्हा प्रतिनिधी
समाधान पाटील

जळगाव तालुक्यातील म्हसावद येथे गांधी रिसर्च फाउंडेशन जळगाव आयोजित "गांधी तीर्थ स्वच्छ शाळा राज्यस्तरीय प्रतियोगिता २०२४ अंतर्गत महाराष्ट्रातील ४६ शाळांची निवड करण्यात आलेली आहे. त्यात स्वातंत्र्य सैनिक पं.ध. थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा समावेश आहे. शाळेसाठी, संस्थेसाठी आणि गावासाठी ही अभिमानाची गोष्ट आहे. *स्वातंत्र्य सैनिक पं. ध.थेपडे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, म्हसावद तालुका जिल्हा जळगाव येथे अंतिम स्वच्छता मूल्यांकनासाठी आदरणीय गिरीश कुलकर्णी सर, सी डी पाटील सर यांनी विद्यालयात भेट देऊन शाळा आणि परिसर स्वच्छतेचे सर्वेक्षण केले. सदर प्रसंगी शाळेच्या विद्यार्थिनींच्या लेझीम पथकाने आदरणीय गिरीश कुलकर्णी आणि सी.डी. पाटील सर यांचे स्वागत केले. भेटी प्रसंगी अंतिम स्वच्छता मूल्यांकन परीक्षण अहवाल, नोंदणी अहवाल, शाळेत राबवलेले स्वच्छता विषयक विविध उपक्रमाविषयीचे बारकावे ,उपक्रमातील सहभागी विद्यार्थी, शिक्षक तसेच उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये झालेले बदल याविषयीची चर्चा करून समितीने आनंद व्यक्त केला . मुलांमध्ये स्वच्छतेचे मूल्य तसेच स्वच्छतेचे संस्कार रुजवणे काळाची गरज आहे .तसेच आजचा विद्यार्थी हा उद्याच्या भारताचा भावी आधारस्तंभ आहे . विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता आणि पर्यावरणविषयीची गोडी निर्माण होणे गरजेचे आहे. म्हणूनच अशा स्पर्धा आयोजित केल्या जातात, असे आदरणीय गिरीश कुलकर्णी सरांनी आपल्या मनोगतात सांगितले. प्रसंगी पथनाट्यात सहभागी शाळेच्या विद्यार्थी–विद्यार्थिनींनी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींना अभिप्रेत असलेल्या स्वच्छतेवर आधारित पथनाट्याचे सादरीकरण केले. सादरीकरणात विद्यार्थ्यांची तळमळ आणि स्वच्छतेविषयी जनजागृतीचा उत्साह पाहून आदरणीय गिरीश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक पी डी चौधरी सर यांनी आदरणीय गिरीश कुलकर्णी आणि सी. डी. पाटील सर यांचा सत्कार करून संस्थेचे संस्थापक चेअरमन गांधीवादी कै. स्वातंत्र्य सैनिक पं. ध. थेपडे यांच्या जीवन चरित्रावर आधारित "कर्मयोगी" पुस्तक भेट दिले. विद्यालयातील शिक्षिका भगिनींनी औक्षण करून गिरीश कुलकर्णी आणि सी.डी.पाटील सरांना शुभेच्छा दिल्या. विचारमंचावर मुख्याध्यापक पी.डी. चौधरी,उपमुख्याध्यापक बच्छाव सर, पर्यवेक्षक के. पी.पाटील तसेच ज्येष्ठ शिक्षक , शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. मोठ्या उत्साहाने विद्यार्थ्यांनी या उपक्रमाचा लाभ घेतला.*



## बापूसाहेब नेने फाउंडेशन कडून सरिता सावंत आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**

आश्रम शाळा म्हणजे जनजाती, गिरीजन, विमुक्त जमाती, भटक्या जमाती व इतर आदिवासी यांच्या शैक्षणिक प्रगती करता उघडलेले विद्यालय. समान संधीच्या युगात काही जमातींना शिक्षणापासून वंचित राहणे योग्य नाही, म्हणून भारतीय संविधानाच्या ४६सा व्या अनुच्छेदात मागासलेल्या जमातींच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगती कडे शासनाने विशेष लक्ष द्यावे याकरिता सरकारी अनुदानाने केलेली तरतूद म्हणजे आश्रम शाळा.या शाळांत वस्तीगृह असून त्यात प्राचीन गुरुकुल पद्धती, अर्वाचीन शिक्षण पद्धती आणि मूल उद्योग पद्धती यांचा समन्वय आहे.तसेच या शाळेत मुलांना निवासाची, भोजनाची आणि शिक्षणाची सोय सरकारी खर्चाने केली जाते. जुन्या मुंबई राज्यात१९५३–५४ साली प्रथम आश्रम शाळा काढण्यात आली. सन १९९२ साली मागासलेल्या जमातीच्या शैक्षणिक व आर्थिक प्रगतीकडे विशेष लक्ष द्यावे या उद्देशाने तुटपुंज्या अनुदानावर कै. दादासाहेब लिमये यांनी सुरू केलेल्या आदिवासी वावळोली, ता. सुधागड जि. रायगड येथील आश्रमशाळेत सरिता सुधाकर सावंत यांची बिनपगारी सेवा देण्यासाठी नियुक्ती झाली. या शाळांत वसतीगृह असून प्राचीन गुरुकुल पध्दतीने शिक्षण दिले जाते. त्यावेळी आश्रमशाळा हि संकल्पनाच सरिता यांच्या साठी नवीन होती. तेच घर, तीच शाळा ,तिथेच खाणे,तिथेच झोपणे हे सारे सरिता सावंत यांच्या साठी अनाकलनीय असे होते.पण शेवटी जे आहे ते स्विकारण्यातच त्यांनी धन्यता मानली."सेवा हिच पुजा" हे व्रत त्यांनी स्विकारले. जीवनातील सकारात्मकतेकडे पाहून मग हा शालेय प्रवास सुरू झाला. २४ तास हि मुले आपल्या मायेच्या पंखाखाली रहाणार आणि आई वडीलांच्या सावलीतून बाहेरच्या जगात आलेली हि पाखरं आपलीच समजून त्यांना मायेची उब देण्यासाठी त्यातच जीवनातील आनंद शोधला. या मुलांना विकासाच्या दृष्टीने त्यांना सोबत घेऊनच जगणं सुरु झाले.स्वताच्या कुटुंबासोबत शाळेतील हे कुटुंब हि आपलेच आहे असे मानून त्यांच्या बाबतीतील अनेक जबाबदाऱ्या पेलण्यासाठी मग सरिता मॅडम सज्ज झाल्या.एक नवे आव्हान स्विकारण्यासाठी तयार झाल्या. शासनाने दिरंगाई ने का होईना वेतन सुरु केले. मिळणाऱ्या मोबदल्यापेक्षा सेवेच्या संधीचे मोल सरिता यांच्या साठी अनमोल होते. कालांतराने विद्यार्थी संख्या वाढली,मग त्यांच्या भौतिक गरजा भागविण्यासाठी थोडीशी तारेवरची कसरत करावी लागली. विद्यार्थ्यांसोबत शैक्षणिक कार्यासोबतच शेतीचे काम, बागकाम करताना नकळत एकमेकांतील प्रेमभाव , आदरभाव, विश्वासामुळे सेवेचे १२ वर्षाचे तप पुरे झाले तेव्हा शाळेतील ह्या बाई मुख्याध्यापक बाई झाल्या. आणि गुळ पापडी सारखे विद्यार्थी आणि त्यांच्या ह्या बाई गुळ पापडी मधुन ज्या प्रमाणे गुळ वेगळे काढता येत नाही, गुलाबजाम मधून पाक वेगळा काढता येत नाही , अगदी तसेच झाले शाळेतील ह्या बाई मुलांच्या आई कधी झाल्या हे त्यांना कळले देखील नाही. सरिता सावंत यांचे विद्यार्थ्यांसोबत नाते आईचे झाले असले तरी २००४ पासून सामाजिक,आर्थिक प्रशासकीय जबाबदाऱ्याही तेवढ्याच तन्मयतेने,काटेकोरपणे त्या पार पाडत आहेत. आणि मग स्वतःच स्वताचे गुणगान न गाता त्यांनी केलेल्या मेहनतीचे प्रमाणिकपणाचे , बक्षीस नकळत कुणीतरी त्याची दखल घेत असतेच सावंत मॅडम च्या बाबतीत तेच झाले बापूसाहेब नेने फाउंडेशन कडून आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी झालेली निवड सावंत मॅडम यांची त्यांच्या सेवेतील धडपड,तळमळ , त्यांनी केलेली सेवा याकरिता स्वतः अध्यक्ष मान.रविंद्र लिमये साहेब यांनी सावंत मॅडम यांची माहिती या पुरस्कारासाठी पाठवली. त्यांनी केलेल्या कार्याची पोहोचपावती म्हणजे बापुसाहेब नेने फाउंडेशन कडून आदर्श शिक्षक पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले.



दिनांक १४ एप्रिल रोजी प्रायव्हेट हायस्कूल पेण येथे बापुसाहेब नेने फाउंडेशन कडून आदर्श शिक्षक हा पुरस्कार सरिता सुधाकर सावंत यांना श्री व सौ बापूसाहेब नेने शुभांगी काकू ने एडवोकेट मंगेश नेने राधिका घोरपडे खजिनदार संजय कडू रवींद्र लिमये आदी मान्यवरांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला. दरवर्षी हा आदर्श शिक्षक सत्कार सोहळा सौ.नेने काकूंच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित केला जातो. यावर्षी नेने काकूंच्या ८७व्या वाढदिवसाचे निमित्त होते. सरिता सावंत मॅडम यांना मिळालेला हा पुरस्कार अध्यक्ष माननीय रवींद्र लिमये साहेब शिल्पा वहिनी लिमये त्यांचे सर्व कुटुंबीय ,सहकारी, आणि मित्र–मैत्रिणीं परिवार यांच्या विषयी कृतज्ञता व्यक्त करुन हा पुरस्कार त्यांनी स्विकारला आहे. सरिता सावंत यांना मिळालेल्या पुरस्काराने त्यांचे सर्व स्तरातून कौतुक व अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## मूक बधिर लेकराला नोकरी आणि माऊलीच्या अश्रुचा बांध फुटला



**दैनिक युवक आधार**
**पनवेल वार्ताहर**

मूकबधिर लेकराला नोकरी आणि माऊलीच्या अश्रुचा बांध फुटला अर्थातच हे आनंदाश्रू होते, होय ही सत्य घटना आहे आणि तीही आपल्या पनवेल शहरातील आहे. शनिवार दिनांक 13 एप्रिल रोजी पनवेल महानगरपालिकेच्यावतीने आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते दि.बा पाटील विद्यालयामध्ये भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विविध उमेदवारांमध्ये दोन दिव्यांग उमेदवारांची निवड झाली व एका उमेदवाराला पुढील फेरीसाठी नियुक्ती करण्यात आली. यावेळी एकुण 3 हजार 551 उमेदवारांनी ऑनलाईन नोंदणी केली होती. त्यापैकी एकुण 872 उमेदवार विविध कंपन्यामध्ये नियुक्ती झाली. यामधील दुसऱ्या फेरीसाठी 205 उमेदवार निवड झाली. यामध्ये या रोजगार मेळाव्यात 213 उमेदवारांना तत्क्षणी नियुक्ती पत्र देण्यात आले.या मेळाव्यात 2लाख 83 हजाराचे सर्वाधिक पॅकेज प्रतिवर्ष देण्यात आले. यावेळी एमबीए, बीई, फायनान्स, डिप्लोमा, 10–12 वी इत्यादी शैक्षणिक पात्रता असलेल्या उमेदवारांनी सहभाग घेतला. अशा भव्य दिव्य स्वरूपात महापालिकेने प्रथमतःच रोजगार मेळाव्याचे आयोजन केले होते. या मेळाव्यात अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला.भविष्यात पनवेल हे एक आर्थिक घडामोडींचे मोठे केंद्र होणार आहे. यादृष्टीने विविध क्षेत्रात रोजगार निमिर्ती होणार आहे. यामध्ये पनवेल महानगरपालिकेचे मोठे योगदान राहणार आहे. या पार्श्वभूमीवरती महापालिकेने आयोजित केलेला या रोजगार मेळावा उज्ज्वल भविष्याच्या दृष्टीने टाकलेले पाऊल असल्याचे वक्तव्य यावेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. या भव्य रोजगार मेळाव्याचे आयोजन केल्याबद्दल यावेळी आलेल्या उमेदवारांनी आयुक्त मंगेश चितळे यांचे शतशः आभार मानले. यावेळी आयुक्तांनी रोजगार मेळाव्यासाठी आलेल्या उमेदवारांनी अत्यंत विश्वासाने व धैर्याने मुलाखतीस सामोरे जाऊन नोकरी मिळवावी असा सल्ला दिला. शासनाने दिलेल्या 100 दिवसीय कृती आराखड्यांतर्गत सात कलमी कार्यक्रमांवर आधारित नियोजित केलेल्या , या भव्य रोजगार मेळाव्याच्या यशस्वीतेसाठी महापालिकेच्या सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

# राज्यातील आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा

■ उद्योजकांचे मेळावे, रोजगारनिर्मिती २० ठिकाणी होणार

■ दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक शिक्षण-रोजगार संधी

**मुंबई** : राज्यातील २० आयटीआयमध्ये अत्याधुनिक प्रयोगशाळा उभारणे, सूक्ष्म आणि लघु उद्योजकांना प्रशिक्षण देण्यासाठी उद्योजक मेळावे आयोजित करून रोजगार निर्मिती करणे आणि राज्यातील आयटीआयमध्ये शिक्षण घेणाऱ्या दिव्यांग विद्यार्थ्यांच्या तांत्रिक शिक्षण आणि रोजगार संधी वाढवण्यात येणार आहेत.

कौशल्य रोजगार उद्योजकता व नावीन्यता विभाग आणि ग्रामीण विकास कार्यक्रम ट्रस्ट बंगळुरू, स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन बंगळुरू, पुण्याची देआसरा फाऊंडेशन व अंधेरीतील प्रोजेक्ट या सामाजिक संस्थामध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत मंगळवारी सामंजस्य करार करण्यात आले.

मंत्रालयात मंत्रिमंडळ बैठकीनंतर कौशल्य विकास विभागाचे सामंजस्य करार करण्यात आले.

युवकांना नवीन तंत्रज्ञान आणि औद्योगिक प्रशिक्षण देण्यासाठी श्री श्री रुरल डेव्हलपमेंट ट्रस्ट तसेच स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन आणि व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय यांच्यात हा त्रिपक्षीय सामंजस्य करार करण्यात आला. श्री श्री रुरल डेव्हलपमेंट प्रोग्राम ट्रस्ट ही एक सेवाभावी संस्था असून ही संस्था प्रशिक्षणार्थ्यांना सॉफ्ट स्किल्स, लीडरशिप व व्यवसाय प्रशिक्षणाच्या माध्यमातून रोजगार व स्वयंरोजगारासाठी तर स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन आपल्या सामाजिक दायित्व निधीद्वारे देशभरातील युवकांसाठी शिक्षण, कौशल्य प्रशिक्षण, रोजगार व स्वयंरोजगार मिळवण्यासाठी विविध उपक्रमांद्वारे कार्य करते.



■ राज्यातील २० शासकीय आयटीआय केंद्रांमध्ये मुंबई, पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती, नाशिक इत्यादी विभागांचा समावेश आहे.
■ प्रकल्पांतर्गत २०२५-२६ पासून पुढील चार वर्षांत प्रशिक्षण दिले जाईल. प्रत्येक वर्षी केंद्रांची संख्या आणि प्रशिक्षणार्थ्यांची संख्या वाढवण्यात येणार आहे.
■ पहिल्या वर्षात १० केंद्रांमध्ये १,५०० युवकांना, दुसऱ्या वर्षात १५ केंद्रांमध्ये २,२५०, तिसऱ्या वर्षात २० केंद्रांमध्ये ३,००० युवकांना आणि चौथ्या वर्षातदेखील ३,००० युवकांना प्रशिक्षण दिले जाणार आहे.
■ करारामुळे चार वर्षांत टप्प्या-टप्प्याने ९,७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे.

## ९,७५० प्रशिक्षणार्थ्यांना प्रशिक्षणाचा लाभ होणार

कराराच्या माध्यमातून स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशन या संस्थेतर्फे येणाऱ्या तीन वर्षाच्या कालावधीमध्ये राज्यातील २० शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांमधून इलेक्ट्रिशियन या व्यवसायाच्या कार्यशाळेची दर्जावाढ करण्यात येणार आहे व सोलार टेक्निशियन लॅब व इंडस्ट्रियल ऑटोमेशन लॅब उभारून देण्यात येणार आहे. स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाऊंडेशनतर्फे राज्यातील वीजतंत्री व्यवसायाच्या सर्व शिल्प प्रदेशांना बंगळुरू येथे आधुनिक तंत्रज्ञान व सॉफ्ट स्किल्सचे पंधरा दिवसांचे प्रशिक्षण मोफत देण्यात येईल. सामंजस्य करारामुळे पुढील चार वर्षात टप्प्याटप्प्याने ९,७५० प्रशिक्षणार्थ्यांना इलेक्ट्रिशियन व अक्षय ऊर्जा क्षेत्रातील आधुनिक तंत्रज्ञान व इंडस्ट्रियल ऑटोमेशन या विषयातील प्रशिक्षणाचा लाभ होणार आहे. यापूर्वीही स्नायडर इलेक्ट्रिक इंडिया फाउंडेशन यांचेकडून अमरावती, नाशिक यासारख्या संस्थांमध्ये इलेक्ट्रिशियन व्यवसायाच्या कार्यशाळेत दर्जा वाढ करून देण्यात आलेली आहे.

## गोंधळात गोंधळ...

(विजय गोहिल)



मुंबई विद्यापीठातील गोंधळाविरुद्ध मुंबईतील फोर्ट येथील विद्यापीठाच्या प्रवेशद्वारावर महाविद्यालयीन शिक्षक संघटनेच्या सदस्यांनी मंगळवारी निदर्शने केली.





# लाडक्या बहिणींना फक्त ५०० रुपये!

## सरकारला आठ लाख बहिणींचा शाप लागणार - नाना पटोले

**मुंबई** : मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेंतर्गत आठ लाख लाडक्या बहिणींना १,५०० रुपयेऐवजी महिना फक्त ५०० रुपये मिळणार आहेत. त्यामुळे महायुती सरकारने लाडक्या बहिणींची फसवणूक केली असून या सरकारला लाडक्या बहिणींचा शाप लागणार, असा घणाघात काँग्रेस नेते नाना पटोले यांनी केला आहे.

सत्तेत येताच लाडक्या बहिणींना अपात्र करण्याची मोहीम महायुती सरकारने हाती घेतली आहे. अडीच कोटी पात्र महिलांची नोंद झाली असताना पडताळणीत ५ लाख पात्र महिलांना अपात्र ठरवले. त्यानंतर आणखी ४ लाख महिलांना अपात्र ठरवले. तर आता ८ लाख महिलांना १,५०० रुपयेऐवजी महिना ५०० रुपये देणार आहे. लाडकी बहीण योजना लागू केली तेव्हा सरकारची बुद्धी भ्रष्ट झाली होती का, असा सवाल करत काँग्रेस नेते आणि माजी विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी सरकारवर निशाणा साधला.

### ...म्हणून ५०० रुपयेच मिळणार - जयस्वाल

आठ लाख लाडक्या बहिणी शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेत असल्याने त्यांना ५०० रुपये महिना मिळणार आहेत, असे कृषी राज्यमंत्री आशिष जयस्वाल यांनी स्पष्ट केले. लाडकी बहीण योजनेंतर्गत पूर्वी होते तेच नियम, अटी आणि निकष आता आहेत. ज्या महिला शेतकरी सन्मान योजनेचा लाभ घेतात अशांना अपात्र करण्यात आल्याचे जयस्वाल म्हणाले.

# वरळीत शिवसेनेच्या ठाकरे गटाचा आज हंडा मोर्चा

**मुंबई** : वरळी परिसरात होत असलेल्या अपुऱ्या व दूषित पाण्याच्या पुरवठ्यामुळे नागरिकांसाठी उद्भवलेल्या आरोग्याच्या समस्येबाबत शिवसेनेकडून (ठाकरे गट) बुधवार, १६ एप्रिल रोजी हंडा मोर्चा काढण्यात येणार आहे.

याबाबत विभागस्तरावर आणि महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांच्याकडेदेखील दाद मागण्यात आली होती. मात्र पाणी समस्या न सुटल्याने अखेर पालिकेच्या जी/दक्षिण विभाग कार्यालयावर सकाळी १०.३० वाजता 'हंडा मोर्चा' काढण्यात येणार असल्याची माहिती माहिती माजी महापौर किशोरी पेडणेकर यांनी दिली.



**शिवसेनेच्या (ठाकरे गट) कार्यकर्त्यांनी पाणीटंचाईविरुद्ध मंगळवारी शिवसेना भवन, दादर येथे निदर्शने केली. बुधवारीदेखील वरळी येथे निदर्शने करण्यात येणार आहेत.** (छायाचित्र - सलमान अन्सारी)

मुंबईच्या अनेक भागात कमी दाबाने आणि दूषित पाणीपुरवठा होत आहे. याबाबत नागरिकांकडून विभाग स्तरावर अनेक तक्रारी येत आहे. तरीही पालिका प्रशासन बघ्याची भूमिका घेत आहे.

या विरोधात ठाकरे गटाने आक्रमक भूमिका घेतली असून जी नॉर्थ विभागवर मोर्चा काढणार आहे.

### गाऱ्हाणे मांडूनही समस्या कायम

पाणी समस्येबाबत काही दिवसांपूर्वीच शिवसेनेचे युवानेते, माजी मंत्री व स्थानिक आमदार आदित्य ठाकरे यांनी महापालिका मुख्यालयात येऊन थेट आयुक्त भूषण गगराणी यांची भेट घेऊन त्यांच्याकडे वरळी भागातील पाणी समस्येबाबत गाऱ्हाणे मांडले होते. मात्र त्यानंतरही पाणी समस्या अद्यापही सुटलेली नाही. त्यामुळे शनिमंदिर, एकता प्रसाद सोसायटी, ग्लोब मिल पॅसेज शाळेसमोर, पांडुरंग बुधकर मार्ग या ठिकाणी एकत्रित जमून महापालिकेच्या जी / दक्षिण विभाग कार्यालयावर धडक देण्यात येणार आहे. यावेळी, मोठ्या प्रमाणात घोषणाबाजी करीत महापालिका प्रशासनाचा निषेध करण्यात येणार आहे.

मोर्चात शिवसेनेचे स्थानिक आमदार आदित्य ठाकरे, खासदार अरविंद सावंत, आमदार सुनील शिंदे, सचिन अहिर, माजी नगरसेवक व विभागप्रमुख आशिष चेंबुरकर आदींसह शाखाप्रमुख, पदाधिकारी, कार्यकर्ते, स्थानिक नागरिक सहभागी होतील.

# भाजपने मुस्लिम व्यक्तीला पंतप्रधान करावे - सपकाळ

**मुंबई** : काँग्रेसचे आजपर्यंत ८९ अध्यक्ष झाले, त्यात सर्व जाती धर्मांचे, महिला, पुरुष, आदिवासी, एससी, एसटी, हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्माचे नेते होते. काँग्रेसने विकासाची कामे करताना त्याची फळे सर्व जातीधर्माला मिळावीत हेच पाहिले पण आता भाजपवाले त्यांना मुस्लिम समाजाची खुप काळजी असल्याचे दाखवत आहेत. मुस्लिम महिलांच्या हितासाठी तीन तलाक व गरिब मुस्लिमांसाठी वक्फ बोर्ड कायदा आणला हे भाजप नेते सांगत आहेत. भाजपचा हा मुस्लिम कळवळा पाहता पंतप्रधानपदी किंवा भाजपच्या राष्ट्रीय अध्यक्षपदी मुस्लिम व्यक्तीला संधी द्यावी, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

अकोला येथे काँग्रेस कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले की, भारतीय जनता पक्षाचे जे. पी. नड्डा यांची अध्यक्षपदाची मुदत संपलेली आहे. नरेंद्र मोदी हे सुद्धा ७५ वर्ष पूर्ण करत आहे, त्यांना निवृत्तीचे वेध लागले असतील, रा. स्व. संघातून कोणाच्या नावाचे पाकीट येणार, त्यापेक्षा तुम्हीच एखाद्या मुस्लिम व्यक्तीला पंतप्रधान किंवा भाजपचा अध्यक्ष करा. सरसंघचालक मोहन भागवत यांनाही विश्रांती द्यावी व त्यांच्या जागी आदिवासी वा दलित समाजाच्या व्यक्तीला सरसंघचालक पदी बसवावे, असेही सपकाळ म्हणाले.

### सत्ता राखण्यासाठी स्थानिक निवडणुका नाही

काँग्रेस प्रदेशाध्यक्ष म्हणाले की, राज्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतलेल्या नाहीत. सर्व सत्ता आपल्याच हाती हवी या हट्टापायी या निवडणुका होऊ दिल्या जात नाहीत. शेतकऱ्यांची तूर बाजारात येण्याच्या आधीच त्याचे भाव पाडण्याचे काम मोदी सरकारने केले, दिडपड भाव दिले नाहीत पण शेतकऱ्यांचे कंबरडे मात्र मोडले. सरकारने अतिवृष्टीचे, गारपीटीमुळे झालेल्या नुकसानीचे पैसे दिले नाहीत, ठेकेदारांचे पैसे दिले नाहीत, बहिणीला पैसे देत नाहीत, एसटी कर्माचाऱ्यांना पगार मिळत नाही, असे हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले आहे.

# महायुतीचे सरकार अडखळून पडणार - रोहिणी खडसे

**मुंबई** : पालकमंत्रिपदाचा वाद, रायगडावरील कार्यक्रमात अजित पवारांना डावलून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना बोलण्याची संधी दिली. निधी वाटपात दुजाभाव, शिंदे सेनेच्या आमदाराचा नाराजीचा सूर, अजित पवारांच्या अर्थ खात्यावर विशेष आर्थिक सल्लागाराची नियुक्ती, एकूणच महायुती सरकारमध्ये काहीच आलबेल नाही. त्यामुळे महायुतीचे सरकार आज ना उद्या अडखळून पडणार, असे संकेत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाच्या आमदार रोहिणी खडसे यांनी दिले आहेत.

दादा डोईजड होतायत म्हणून आधी मंत्रालयातील फाइली दादांकडून भाईंकडे पाठवण्यात आल्या. त्यानंतर अर्थ विभागात लक्ष ठेवण्यासाठी स्वतःचा जवळचा अधिकारी आर्थिक सल्लागार म्हणून बसवला, असे रोहिणी खडसे यांनी एक्सवर पोस्ट करत म्हटले आहे.

# वेगवेगळ्या पार्श्वभूमीमुळे मतभेद होणारच - पाटील

**मुंबई** : सत्ताधारी महायुतीमध्ये मतभेद असल्याच्या चर्चा सुरू असतानाच, वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोक एकत्र आल्यावर मतभेद होणे ही नैसर्गिक गोष्ट आहे, असे महाराष्ट्राचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री आणि भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी स्पष्ट केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केंद्रीय गृहमंत्री अमित शहांना उपमुख्यमंत्री अजित पवारांविषयी काही तक्रारी केल्याच्या वृत्तांवर प्रतिक्रिया देताना पाटील बोलत होते. पाटील म्हणाले, जिथे एकाच रक्ताचे लोक एकाच छताखाली राहतात, तिथेसुद्धा मतभेद होतात. येथे तर वेगवेगळ्या पार्श्वभूमीतील लोक एकत्र आले आहेत. अशा परिस्थितीत जर काहीच खडबडाट नसेल, तर ते जिवंत आहेत की नाही, हे तपासून पाहावे लागेल.

# भूखंड विकसित करण्यासाठी एनओसी द्यावी - अमित साटम

**मुंबई** : जुहू येथील अनधिकृत बांधकामे जमीनदोस्त करण्यात आली आहेत. त्यानंतर ८ एकरच भूखंड म्हाडाच्या ताब्यात आला असून या भूखंडावर क्रीडा सुविधा जिल्हास्तरीय ओपन-टू-स्काय सुविधा विकसित करण्यासाठी म्हाडाने 'ना-हरकत प्रमाणपत्र' (एनओसी) देण्याची मागणी भाजपचे स्थानिक आमदार अमित साटम यांनी म्हाडाला पत्र लिहून केली आहे. यामुळे परिसरातील आणि संपूर्ण मुंबईतील नागरिक आणि तरुणांना फायदा होईल, असे अमित साटम म्हणाले.

फेब्रुवारीमध्ये म्हाडाच्या मुंबई युनिटने २० वर्षांनंतर एका बिल्डरकडून आठ एकरचा जुहू येथील भूखंड परत मिळवला. बिल्डरने खोट्या झोपड्या दाखवून आणि बनावट कागदपत्रे सादर करून हा भूखंड बेकायदेशीरपणे एसआरए योजनेत जोडला होता. हा भूखंड जुहूमधील एका प्रमुख परिसरात ऋतंभरा कॉलेज समोर आहे. या भूंखडावरील बेकायदा बांधकाम जमीनदोस्त करण्यात आले असून भूखंड आता म्हाडाच्या ताब्यात आला आहे, असे साटम म्हणाले.

# माता, बालमृत्यू रोखण्यासाठी पुढाकार हवा - डॉ. सावंत

**मुंबई** : आजच्या विद्यार्थिनी या उद्याच्या माता आहेत. त्यामुळे माता व बालमृत्यू रोखण्यासाठी आणि उद्याच्या सशक्त मातांच्या आरोग्यासाठी मितवा फाऊंडेशनने पुढाकार घ्यावा, असे आवाहन राज्याचे माजी आरोग्य मंत्री व कुपोषण निर्मूलन टास्क फोर्स समितीचे अध्यक्ष डॉ. दीपक सावंत यांनी नुकतेच केले.

मितवा फाऊंडेशन ही सामाजिक संस्था गेली दहा वर्षं वाडा मलवाडा या आदिवासी भागात विद्यार्थीविकास हेतूने काम करते. त्यांचा दशकपूर्ती सोहळा कांदिवली (पूर्व), ठाकूर व्हिलेज येथे आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी मंचावर समुपदेशक डॉ. महेश अभ्यंकर, समाजसेवक शशांक गोडबोले, मलवाडाचे समाजसेवक कमलाकर भोईर, दिव्येन पटेल, मितवा फाऊंडेशनच्या अध्यक्ष भाग्यश्री राऊ आधी उपस्थित होते. या दशकपूर्ती सोहळ्याला मलवाडा गावातून १८ विद्यार्थी, ९ शिक्षक व २ ग्रामसेवक आले होते.



भाग्यश्री राऊ, उत्तम राऊ आणि त्यांच्या सर्व चूमचे कार्य कौतुकास्पद असल्याचे सावंत यांनी सांगितले. विद्यार्थिनींचे नियमित हिमोग्लोबिन चाचणी, आरोग्य तपासणी केल्यास भविष्यात उद्भवणारे आजार आणि माता व बालमृत्यू, कूपोषण रोखता येईल, असा विश्वास डॉ. दीपक सावंत यांनी व्यक्त केला.

डॉ. सावंत यांनी फाउंडेशनच्या स्मरणिकेचे प्रकाशन केले. ब्लड कॅन्सरवर दोनदा मात करणाऱ्या सिद्धी भिडेचा यावेळी गौरव करण्यात आला. डॉ. महेश अभ्यंकर यांनी सादरीकण करून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. फाऊंडेशनचे विश्वस्त तनुजा मुधोळकर, डॉ. विराज संघवी, ललित धावडे, कार्यकर्ते व्यंकटेश राऊ व कौस्तुभ लाडवा आणि इतर उपस्थित होते.

# कर्मचारी संघटनेचे नेते ग. दि. कुलथे यांना श्रद्धांजली

**मुंबई** : पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असे नेतृत्व आणि कुशल संघटक ज्येष्ठ नेते ग. दि. कुलथे यांच्या निधनामुळे शासन आणि अधिकारी-कर्मचारी संघटनेतील संवाद सेतू हरपला आहे, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

ग. दि. कुलथे यांनी शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांचे प्रश्न कौशल्याने सोडविले. पारदर्शक प्रशासनासाठी आग्रही असणारे कुलथे स्वभावाने अतिशय शांत आणि संयमी होते. मात्र महत्त्वच्या प्रश्नांवर त्यांनी अतिशय कणखर भूमिका घेतली. राजपत्रित अधिकारी महासंघाचे संघाचे प्रदीर्घकाळ नेतृत्व करताना त्यांनी प्रशासकीय अधिकाऱ्यांत पारदर्शकता, संवेदनशीलता, जबाबदारीची भावना रुजवण्यासाठी प्रयत्न केले. "पगारात भागवा"सारखा अनोखा उपक्रम राबवला. राज्यातील नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या अडचणींवर मात करण्यासाठी त्यांनी नेहमीच पुढाकार घेतला, असेही मुख्यमंत्र्यांनी म्हटले आहे.

**ग्रामीण आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी महत्त्वाचे पाऊल**

# वैद्यकीय व्यावसायिकांना मिळणार क्रेडिट पॉइंट

**मुंबई** : महाराष्ट्र वैद्यकीय परिषद राज्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) प्रणालीच्या माध्यमातून त्यांचा परवाना नूतनीकरणासाठी क्रेडिट पॉइंट दिले जातात. याच अनुषंगाने ग्रामीण भागातील आरोग्य सेवा बळकटीकरणासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना ग्रामीण भागात स्वेच्छा सेवेसाठी क्रेडिट पॉइंट द्यावे, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेला दिल्या आहेत.

ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना त्यांच्या आर्थिक परिस्थितीमुळे योग्य ते उपचार प्राप्त होत नाही. त्यासाठी नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांना ग्रामीण भागात स्वेच्छा सेवा देता यावी. जेणे करून ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांना देखील चांगले उपचार व आरोग्य सेवा उपलब्ध होण्यास मदत होईल. मुख्यमंत्री यांच्या सूचनांचे पालन करत, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने राज्यातील नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिकांसाठी सातत्यपूर्ण वैद्यकीय शिक्षण (सीएमई) प्रणालीत काही महत्त्वपूर्ण सुधारणा केल्या आहेत.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदे अंतर्गत सद्यःस्थितीत साधारण दोन लाख वैद्यकीय व्यावसायिक कार्यरत आहेत. या वैद्यकीय व्यावसायिकांचे वैद्यकीय परवान्यांचे दर पाच वर्षांनी नूतनीकरण करण्यात येते. हे नूतनीकरण करण्यासाठी या वैद्यकीय व्यावसायिकांना क्रेडिट पॉइंट दिले जातात. हे क्रेडिट पॉइंट देतांना वैद्यकीय व्यावसायिकांनी त्यांच्या क्षेत्रातील ज्ञान अद्ययावत करण्यासाठी विविध परिषदांना उपस्थित राहणे आवश्यक असते.

परंतु वैद्यकीय व्यावसायिकांसाठी असलेल्या सीएमई प्रणालीत सुधारणा करण्याच्या मुख्यमंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांनुसार, वैद्यकीय व्यावसायिकांना ग्रामीण भागात घेण्यात येणारे मोफत वैद्यकीय शिबिरे व इतर सेवाभावी उपक्रमांच्या माध्यातून स्वेच्छा सेवा देणे, आवश्यकता भासल्यास शस्त्रक्रिया करणे अशा प्रकारचे कोणत्याही मानधनाशिवाय आरोग्य सेवेत योगदान देता येणार आहे.

### तीन तासांना एक, तर सहा तासांना दोन पॉइंट मिळणार

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने केलेल्या सुधारणांनुसार, नोंदणीकृत वैद्यकीय व्यावसायिक गावांमधील वैद्यकीय व सर्जिकल्स शिबिरांमध्ये जाऊन स्वेच्छा सेवा देतील. गावपातळीवरील वैद्यकीय शिबिरांमध्ये तीन तास काम केल्यास एक पॉइंट व सहा तास काम केल्यास दोन पॉइंट दिले जाणार आहेत. या पॉइंट्सची मदत वैद्यकीय व्यावसायिकांना वैद्यकीय परवाना नूतनीकरण करताना होणार आहे.



### ग्रामीण आरोग्य समस्यांचा अभ्यास

खऱ्या अर्थाने ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्य विषयक समस्या डॉक्टरांपर्यंत पोहचण्यास मदत होणार असून शहरी भागातील डॉक्टरांना वैज्ञानिक दृष्ट्या ग्रामीण भागातील आरोग्य समस्यांचा अभ्यास करणे शक्य होणार आहे. तसेच काही नोंदणीकृत डॉक्टर्स या स्वरूपाच्या सेवा देत आहेत. या प्रकारची सुधारणा सीएमई प्रणालीत करण्यात आली असल्याची माहिती महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेमार्फत देण्यात आली आहे.

# एमएमआरडीएच्या सहआयुक्तपदी अस्तिक पांडे

**मुंबई** : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्रीपदाची धुरा सांभाळताच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे सत्र सुरू आहे. मंगळवारी पाच सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या.

यात मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या (एमएमआरडीए) सहआयुक्त पदी अस्तिक कुमार पांडे यांची बदली करण्यात आली आहे. पांडे यांच्याकडे यापूर्वी कर्मचारी विमा योजनेच्या आयुक्त पदाची जबाबदारी होती, तर आर. एस. चव्हाण यांची बदली आता कर्मचारी विमा योजनेच्या आयुक्त पदी करण्यात आली आहे.

राज्य सरकारने पाच प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत. यात राहुल गुप्ता यांची बदली आता हिंगोलीच्या जिल्हाधिकारी पदी करण्यात आली आहे, तर डहाणूच्या सहाय्यक जिल्हाधिकारी सत्यम गांधी यांची बदली सांगली मिरज कुपवड शहर महापालिकेच्या आयुक्त पदी करण्यात आली आहे.

तर विशाल खात्री यांची बदली आता डहाणूच्या सहाय्यक जिल्हाधिकारी आणि आयटीडीपीच्या प्रकल्प अधिकारी पदाची जबाबदारी देण्यात आली आहे.